सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला रस्ते विकास, पाणी पुरवठा योजनेचा आढावा

# अतिक्रमण हटाव मुळे बेघर झालेल्या परिवारांना मोफत घरे देणार : एकनाथ शिंदे

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ - शहरात रस्ते विकास, पाणी पुरवठा वितरणाचे सुसूत्रिकरण, सांडपाणी प्रक्रिया, अतिक्रमण हटाव मोहिमेत बेघर झालेल्यांना मोफत घरे देणे याबाबत महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला.





शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत बेघर झालेल्या परिवारांना मोफत घर देण्यात येईल, त्यासाठी म्हाडा कडुन घरे मिळविण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश श्री. शिंदे यांनी यंत्रणेस दिले

शहरातील मोकळे झालेल्या रस्त्याचा विकास करण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच शहराची पाणी पुरवठा व्यवस्था याबाबत सादरीकरण आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोर करण्यात आले. तसेच दररोज पाणी पुरवठा करण्यासाठी होत असलेल्या उपाययोजना, सांडपाणी प्रक्रिया इ. बाबत आढावा घेण्यात आला.

हॉटेल रामा येथे आयोजित बैठकीस राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट,आ. अर्जुन खोतकर, आ.रमेश बोरनारे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित,सिडको चे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड,अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, महावितरण चे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट उपस्थित होते.

रस्ते विकासासाठी १९५० कोटीचा आराखडा

आगामी कुंभामेळाच्या अनुषंगाने नाशिक,त्र्यंबकेश्वर, छत्रपती संभाजी नगर, वेरूळ(घृषणेश्वर मंदिर), शिर्डी, शनि शिंगणापूर या ठिकाणी तीर्थ यात्रा करण्यासाठी भाविक येतील. त्यासाठी शहरातून या सर्व भागाचे दळणवळण अधिक गतिमान व्हावे. तसेच पडेगाव रस्ता, पैठण रस्ता, बीड बायपास, जालना रस्ता, जळगाव रस्ता, सिडको ते बीड बायपास हे रस्ते तसेच महावीर चौक फ्लाय ओव्हर ब्रीज, अमप्रीत हॉटेल जवळ अंडरपास अशा ४४.५ किमी रस्त्याचा या रस्ते विकास प्रकल्पात समावेश आहे. या एकूण प्रकल्पात १२ फ्लायओव्हर होणार आहेत, अशी माहिती सादरीकरणात देण्यात आली.

रस्ते विकासासाठी १९५० कोटी रुपयांचा निधी लागणार असून सन २०२५ - २६ मध्ये ३९० कोटी, सन २०२६-२७ मध्ये ११७० कोटी रुपये, सन २०२७ - २८ मध्ये ३९० कोटी रुपये असा तीन टप्प्यात हा निधी खर्च होईल.

मार्च २०२६ पर्यंत दररोज पाणी पुरवठा

शहरात येत्या मार्च २०२६ अखेर दररोज पाणी पुरवठा करता यावा यासाठी उपाय योजना सुरु आहेत. पहिला २६ एम एल डी चा टप्पा कार्यान्वित झाला आहे. दुसऱ्या टप्प्यात २०० एम एल डी पुरवठा नोव्हेंबर अखेर सुरु होईल. त्यामुळे एक दिवसाआड पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तर मार्च अखेर दररोज पाणी पुरवठा शक्य होईल, असे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले. पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास आणण्यासाठी ८२२ कोटी रुपये कर्ज स्वरूपात घेण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

अतिक्रमण हटाव मुळे बेघर झालेल्या लोकांना मोफत घरे

शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत बेघर झालेल्या लोकांना मोफत घरे देण्यासाठी उपाययोजना सुरु आहेत. १५० घरे म्हाडा कडुन मिळणार असून त्यासाठी २४ कोटी रुपये निधी लागणार आहे. तसेच विविध आवास योजना मधूनही नागरिकांना घरे उपलब्ध करून द्यावीत. तसेच उद्योग वाढीमुळे येणाऱ्या कामगार, कर्मचारी वर्गाला परवडतील अशा घराच्या निर्मितीचा प्रकल्प राबवावा, अशी सुचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

सांडपाणी प्रक्रिया योजना ही पूर्णत्वाकडे

सांडपाणी प्रक्रियेसाठी ८३० कोटी रुपयांची योजना राबविण्यात येत असून ती ७५ टक्के पूर्णत्वास आली आहे. जून पर्यंत ही योजना पुर्ण होईल, असे जी.श्रीकांत यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महापालिकेने स्वतः च्या उत्पन्नाचे स्रोत वाढवायला हवे. सांडपाणी प्रक्रियेत शुद्ध केलेल्या पाण्याचा पुनः वापर करण्याबाबत एमआयडीसीशी करार करावा. शहरातील रहदारी अडथळे विरहित व्हावी यासाठी रस्ते विकास प्रकल्प राबवा. विकास आराखड्या नुसार रस्ते विकास करा. अतिक्रमण हटाव मुळे बेघर झालेल्या कुटुंबांना घरे द्या, असे निर्देश श्री. शिंदे यांनी दिले.

तसेच अतिवृष्टी मुळे नुकसान ग्रस्त भागात तात्काळ पंचनामे करा व शेतकऱ्यांना मदत करा. जालना नांदेड रस्त्याच्या भू संपादन प्रक्रियेत मूल्यांकन फरकाची शेतकऱ्यांची मागणी आहे, त्याची तपासणी करा, असे ही निर्देश त्यांनी दिले.

# मतदान ओळखपत्र नोंदणीसाठी ‘आधार’ बारावा दस्तऐवज

## सर्वोच्च न्यायालयाचा निवडणूक आयोगाला आदेश

नवी दिल्ली: बिहारमधील एसआयआर प्रणालीच्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. निवडणुकीसाठी मतदार ओळखपत्र नोंदणी करताना 'आधार कार्ड'ला बारावा दस्तऐवज म्हणून स्वीकारले जाईल, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिला आहे.



सोमवारी या प्रकरणावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी आधार कार्ड स्वीकारले पाहिजे, मात्र त्याची सत्यता तपासण्याचा अधिकार त्यांना राहील. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की आधार कार्ड हे नागरिकत्वाचा पुरावा मानले जाणार नाही, परंतु ते एक वैध ओळखपत्र म्हणून स्वीकारले जाईल. निवडणूक आयोगाने हा आदेश आपल्या संकेतस्थळावर त्वरित जाहीर करण्याचे निर्देशही दिले आहेत.

न्यायालयातील महत्त्वाचे मुद्दे

आधारची भूमिका: निवडणूक आयोगाच्या वकिलांनी आधारला नागरिकत्वाचा पुरावा मानण्यास नकार दिला, तर याचिकाकर्त्यांनी (काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी) ओळखपत्रासाठी ते स्वीकारण्याची मागणी केली. सर्वोच्च न्यायालयाने आधार केवळ ओळखपत्र असल्याचा मुद्दा मान्य केला.

मतदारांची समस्या: याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, अनेकांकडे मतदार नोंदणीसाठी आवश्यक असलेले ११ दस्तऐवज उपलब्ध नाहीत, अशा परिस्थितीत आधार कार्ड हा एकमेव पर्याय असतो. विशेषतः गरीब आणि वंचितांसाठी हेच एकमेव ओळखपत्र असते.

आयोगाची भूमिका: निवडणूक आयोगाने यापूर्वी आधारला मतदान ओळखपत्र नोंदणीसाठी स्वीकारण्यास नकार दिला होता. यावर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले की, अनेक ठिकाणी आधार कार्डच्या आधारे मतदार नोंदणी अर्ज स्वीकारले जात नाहीत आणि अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते. यावर, आयोगाच्या वकिलांनी सांगितले की, ते कायद्यानुसार आधार स्वीकारत आहेत, मात्र ते नागरिकत्वाचा पुरावा मानत नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ज्या नागरिकांकडे मतदान ओळखपत्र नोंदणीसाठी इतर दस्तऐवज नाहीत, त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## देशद्रोही आणि नक्षलवादी पकडण्यासाठी एनआयएची धडक पाच राज्यांमध्ये कारवाई

नवी दिल्ली : देशद्रोही आणि नक्षलवादी तसेच त्यांचे सहकारी पकडण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्थेने अर्थात एनआयएने धडक कारवाई सुरू केली आहे. देशातील पाच राज्यांमध्ये ठिकठिकाणी धाडी टाकून एनआयएने तपास सुरू केला आहे. जम्मू काश्मीरमध्ये २२ ठिकाणी एनआयएने धाडी टाकल्या आहेत. स्थानिक पोलीस आणि निमलष्करी दलांची मर्यादीत प्रमाणात मदत घेतली जात आहे.


जम्मू काश्मीरमध्ये बारामुला, कुलगाम, अनंतनाग, पुलवामा जिल्ह्यात ठिकठिकाणी एनआयएने धाडी टाकल्या आहेत. सेमापूर भागातून इकबाल नावाच्या व्यक्तीला एनआयएने ताब्यात घेतले आहे. एनआयए एक कायदेशीर कारवाई करत आहे. या कारवाईबाबत आवश्यक तेवढी गोपनीयता बाळगण्यात आली आहे.

# सोशल मीडिया बंदी विरोधात नेपाळचे तरुण रस्त्यावर, १८ जणांचा मृत्यू

काठमांडू : अफवा आणि खोट्या बातम्या मोठ्या प्रमाणात वेगाने पसरवण्यासाठी सोशल मीडियाचा गैरवापर केला जातो. हे कारण देत नेपाळ सरकारने फेसबुक, यूट्युबसह २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर देशात बंदी लागू केली. या बंदीच्या विरोधात नेपाळची तरुण पिढी रस्त्यावर उतरली आहे. सरकारी निर्णयाचा विरोध करत तरुणांनी आंदोलन सुरू केले आहे. अनेक तरुण तरुणी सरकारी निर्णयाला विरोध करण्यासाठी थेट नेपाळच्या संसदेच्या परिसरात घुसले. पण सुरक्षा रक्षकांनी या तरुणांना तिथेच अडवले.

रस्त्यावर हजारोंच्या संख्येने जमाव जमल्याचे बघून पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या तसेच लाठीमार केला. आंदोलकांची धरपकड सुरू आहे. खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण काठमांडूसह नेपाळच्या चार जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. महत्त्वाच्या ठिकाणांवरील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

नेपाळ सरकारने एक तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत काठमांडूसह संपूर्ण देशातील अंतर्गत स्थितीचा आढावा घेतला जाईल. पोलिसांनी नेपाळची राजधानी असलेल्या काठमांडूसह चार जिल्ह्यांमध्ये रात्री दहा वाजेपर्यंत संचारबंदी लागू केली आहे. आवश्यकता भासल्यास संचारबंदीची मुदत आणखी वाढवली जाणार आहे.



सोशल मीडियावरील बंदी विरोधातल्या आंदोलनात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला असून ८० जण जखमी झाले आहेत. भारत - नेपाळ सीमेवर दोन्ही बाजूच्या सुरक्षा पथकांनी हायअलर्ट जाहीर केला आहे. सध्या भारताच्या सशस्त्र सीमा दलाचे जवान भारत - नेपाळ सीमेवर आहेत. या जवानांना अलर्ट राहण्याच्या सूचना आहेत. सीमेवर तसेच काठमांडूत ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावून अडथळे टाकून जमावाच्या हालचालींवर मर्यादा आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## गोराई बीचवर भरतीच्या लाटेत बस गेली वाहून



मुंबई: गोराई बीचवर सोमवारी एक थरारक घटना घडली. एक मिनीबस भरतीमुळे समुद्राच्या लाटेत वाहून गेल्याने घबराट निर्माण झाली. मात्र, सुदैवाने तात्काळ बचावकार्य सुरू झाल्यामुळे मिनीबसमध्ये असलेल्या सर्व प्रवाशांना, ज्यात महिलांचाही समावेश होता, कोणतीही इजा न होता सुखरूप बाहेर काढण्यात आले.

स्थानिक पोलिसांनी भरतीच्या वेळी समुद्राच्या पाण्याजवळ वाहन चालवू नका, असे वारंवार सांगूनही चालकाने निष्काळजीपणा केला. या घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी चालक आणि वाहन मालकाविरोधात एफआयआर दाखल केला आहे.

ही घटना मानवी निष्काळजीपणाचे उदाहरण असून, सुरक्षा नियमांचे पालन करणे किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित करते.

# सीमेवर लावणार अत्याधुनिक रडार प्रणाली

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानी ड्रोन हल्ल्यांनंतर, भारतीय लष्कराने उत्तरी आणि पश्चिम सीमेवर अत्याधुनिक रडार प्रणाली बसवण्याची तयारी सुरू केल्याची माहिती संरक्षण क्षेत्रातील सूत्रांनी दिली. हे रडार सिस्टम लष्कराच्या 'आकाशतीर' एअर डिफेन्स नेटवर्कशी एकत्रित केले जाईल, जे हवाई हल्ल्यांचा मागोवा घेऊन त्यांना हवेतच नष्ट करेल.



लष्कराने यासाठी ४५ लो लेव्हल लाइट वेट रडार (एलएलएलआर-ई) आणि ४८ एअर डिफेन्स फायर कंट्रोल रडार - ड्रोन डिटेक्टर्स (एडीएफसीआर-डीडी) खरेदीसाठी प्रस्ताव मागवले आहेत. यासोबतच १० लो लेव्हल लाइट वेट रडार (इंप्रूव्ड) साठी देखील प्रस्ताव मागवले गेले आहेत. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने रात्रीच्या अंधारात भारतावर अनेक ड्रोन हल्ले केले होते. लष्कराने यातील बहुतेक ड्रोन हवेतच पाडले, तरी काही ड्रोन सीमारेषा ओलांडून नागरिक भागांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले होते. यामुळे आता लष्कराने शत्रुचा पूर्णपणे नाश करण्याचा निर्धार केला आहे.

हा नवा रडार सिस्टम अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाने युक्त असून, तो कोणत्याही अवघड परिस्थितीत - मग ती डोंगराळ भाग असो, वाळवंट असो किंवा किनारपट्टी शत्रुचा शोध घेऊन त्याचे ट्रॅकिंग आणि नष्ट करण्याचे कार्य करेल.

या ॲडव्हान्स रडार सिस्टममध्ये रडार क्रॉस सेक्शनचा (आरसीएस) वापर करून लक्ष्य शोधण्यापासून ते त्याला हवेतच संपवण्यापर्यंतची कार्यक्षमता असेल. हे सर्व रडार आकाशतीर प्रणालीशी जोडले जाणार आहेत, ज्यामुळे त्यांचा प्रभाव अधिक गतीमान व अचूक असेल.

हा रडार सिस्टम एकाच वेळी १०० लक्ष्यांचा मागोवा घेऊ शकतो, आणि त्याची रेंज सुमारे ५० किलोमीटर असेल. त्यामुळे तो डोंगर, रेगिस्तान आणि तटीय भागांमध्येही हवाई हल्ल्यांचा अचूक शोध घेऊ शकतो.

## रावी, सतलज आणि चिनाब नद्यांचं रौद्ररूप! ४ कोटी लोकांवर जीवघेणं संकट, ५६ जणांचा बळी

अमृतसर : पाकिस्तानमधील रावी, सतलज आणि चिनाब या नद्यांना आलेल्या पुरामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर आलेल्या या पुराचा २५ जिल्ह्यातील तब्बल ४,१०० हून अधिक गावांना फटका बसला आहे. २६ ऑगस्टपासून आतापर्यंत पंजाब प्रांतात सुमारे ५६ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो कुटुंबे बेघर झाली आहेत. अनेक नागरिक बेपत्ता असून त्यांचा शोध अजूनही सुरू आहे. या संकटावर मात करण्यासाठी प्रांतीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मदत छावण्यांची उभारणी केली असून वैद्यकीय सेवांसाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत, अशी माहिती महासंचालक इरफान अली काठिया यांनी दिली. पाकिस्तानात नद्यांना आलेल्या भीषण पुरामुळे हाहाकार माजला आहे. आतापर्यंत २५ जिल्ह्यांतील ४,१०० पेक्षा जास्त गावे जलमय झाली असून पंजाब प्रांतात किमान ५६ जणांचा बळी गेला आहे. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या आपत्तीमध्ये शेकडो नागरिक बेघर झाले असून काहीजण अजूनही बेपत्ता आहेत. पुरात वाहून गेलेल्यांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांचे प्रयत्न सुरू आहेत. प्रांतीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे महासंचालक इरफान अली काठिया यांनी सांगितले की, या पुरामुळे तब्बल ४.१ कोटी लोकांवर परिणाम झाला आहे. मोठ्या प्रमाणावर झालेल्या विस्थापनाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने ४२५ मदत छावण्या व तंबू नगरी उभारली असून, येथे नागरिकांना अन्न व तात्पुरते निवास दिले जात आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणापासून वंचित ठेवणारा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

किनवट/माहूर, दि. ८ सप्टेंबर : राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांतून शिक्षण घेण्याची संधी हिरावून घेणारा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी किनवट/माहूर विधानसभा क्षेत्राचे आमदार भिमरावजी केराम यांनी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे केली.



आ. केराम यांनी मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले की, राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागामार्फत दरवर्षी आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातील नामांकित निवासी शाळांत शिक्षण मिळण्यासाठी विशेष योजना राबविली जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी देखील या शाळांची निवड करून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून अर्ज मागविण्यात आले होते. या अर्जांना आदिवासी पालक व विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून पात्र विद्यार्थ्यांची यादीही अंतिम करण्यात आली होती.

मात्र, शासन निर्णय क्र.-नानिशा-११२५/प्र.क्र.४८/का.१२, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ नुसार दि. ४ सप्टेंबर रोजी जाहीर केलेल्या आदेशाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये नव्या विद्यार्थ्यांचे वाटप करण्यात येणार नाही, असे निर्देश देण्यात आले आहेत. या धक्कादायक निर्णयामुळे इयत्ता १ ली व २ रीतील अनेक आदिवासी मुले इंग्रजी माध्यमातील दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहणार आहेत.

आ. केराम यांनी या निर्णयाला अन्यायकारक व भेदभाव करणारा ठरवत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी निवेदनात म्हटले की, अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागामार्फत इंग्रजी माध्यम शाळांची सुविधा कायम ठेवली आहे. मात्र केवळ आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा उपक्रम थांबविण्यात येत आहे. यामागे आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीला रोखण्याचा शासनाचा जाणीवपूर्वक हेतू आहे का? असा प्रश्न आदिवासी समाजात निर्माण झाला आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील आदिवासी समाज शिक्षणापासून कोसो दूर आहे. अशा परिस्थितीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांत शिक्षण मिळाल्यासच त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावू शकतो. त्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करून पात्र विद्यार्थ्यांना नामांकित निवासी शाळांत प्रवेश मिळावा, अशी ठाम मागणी आ. केराम यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

यामुळे संपूर्ण आदिवासी समाजात प्रचंड नाराजी असून, शासनाने तातडीने निर्णयाचा पुनर्विचार करून विद्यार्थ्यांना पूर्ववत प्रवेश द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त कार्यक्रमाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

छत्रपती संभाजीनगर ,दि. ०८, : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमाच्या पूर्वतयारी व नियोजनाचा आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आढावा घेतला.

विभागीय आयुक्त कार्यालय येथे आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर रोजी सिध्दार्थ उद्यान येथे होणाऱ्या मुख्य शासकीय ध्वजारोहणाच्या नियोजनाबाबत विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संगीता राठोड तसेच पोलीस विभाग, क्रीडा विभाग, शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, विद्युत विभाग, सामाजिक वनीकरण, अग्निशमन विभाग, सामाजिक वनीकरण, समाज कल्याण आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पापळकर म्हणाले की, मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. संबंधित विभागांनी कार्यक्रमस्थळी नियोजन करावे. त्याचबरोबर स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, पत्रकार तसेच उपस्थित राहणारे पाहुणे यांची व्यवस्था तसेच राजशिष्टाचाराप्रमाणे काळजी घेत आसन व्यवस्था करण्याचे निर्देशही पापळकर यांनी संबंधितांना दिले.यावेळी विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हास्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत एकलव्य विद्या संकुलाचा विजय



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय हॉकी व नेहरू हॉकी क्रीडा स्पर्धेत एकलव्य आश्रम शाळा मंगरूळ यमगरवाडी तालुका तुळजापूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विजेतेपद मिळविले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या चारही संघांची आगामी विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

सर्व विजयी खेळाडूंचे व क्रीडा विभाग प्रमुख व क्रीडा प्रशिक्षक ज्ञानेश्वर भुतेकर, बालाजी क्षीरसागर, यांचे संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष उद्धवजी काळे, कार्यवाह, विवेकजी अयाचीत, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, संस्थेचे संचालक मंडळ व क्रीडा समितीचे सर्व सदस्य व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.



## संक्षिप्त वृत्त...

### अपघातात पादचारी ठार

**तुळजापूर, दि.८ सप्टेंबर -**

तुळजापूर-लातूर राष्ट्रीय महामार्ग (एनएच ३६१) वर वडगाव लाख येथील नायरा पेट्रोल पंपाजवळ झालेल्या अपघातात राम अर्जुन कांबळे (वय ५२) यांचा मृत्यू झाला. दि.६ सप्टेंबर रोजी रात्री मोटरसायकलची चैन तुटल्याने कांबळे यांनी आपली दुचाकी रस्त्यालगत उभी करून मदतीसाठी पेट्रोल पंपाकडे पायी जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले. अपघातानंतर संबंधित वाहनचालक कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी फिर्यादी कमलाकर भिवा पवार (वय ५२, रा. वाडीबामणी, ता. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### मिरवणुकीतून वाद; युवकाला मारहाण

**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

नळदुर्ग शहरातील चौडी चौक ते डीसीसी बँक परिसरात मिरवणुकीदरम्यान किरकोळ धक्का लागण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका युवकाला मारहाण केल्याची घटना घडली. दि.६ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजता आरोपी गुरुप्रसाद शिवा धुमाळ, सागर राठोड, चेतन सिदमल्ले व शिवा धुमाळ (सर्व रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी फिर्यादी अविनाश भारत जाधव (वय ३०, रा. आयोध्या नगर, नळदुर्ग) यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व लोखंडी लेझीमने मारहाण केली. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिवमध्ये मोबाइल फोनवरून मारहाण

**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

साठेनगर परिसरात आरोपी किरण रामदास मगर यांनी मोबाइल फोन न देण्याच्या वादातून योगेश भारत रणदिवे यांच्यावर शिवीगाळ व लाथाबुक्या तसेच विटा मारून मारहाण केली. या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# जिल्हा प्रशासन महिला बचत गटांना सहकार्य करणार

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत जिल्ह्यात उभारलेले बचत गट हे तळागाळातील महिलांसाठी मोठा आधारस्तंभ ठरले असून, आज अनेक महिला छोट्या उद्योगांच्या माध्यमातून महिन्याला तब्बल ६० हजार रुपयांपर्यंत कमाई करत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

कै. पवन राजे कॉम्प्लेक्स येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ, नवतेजस्विनी प्रकल्प व माता सावित्री लोकसंचलित साधन केंद्र यांच्या वतीने आयोजित १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळाव्यात ते बोलत होते. जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, बचत गटांच्या महिला फक्त उद्योगच चालवत नाहीत, तर कुटुंबामध्ये सकारात्मक बदल घडवून आणत आहेत.

प्रधानमंत्री लखपती दीदी योजनामुळे महिलांनी नवे व्यवसाय सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होईल आणि त्या सक्षम उद्योजिका बनतील. त्यांनी पुढे सांगितले की, महिलांनी दशसूत्रीचे काटेकोर पालन करून बचतीचे आणि व्यवसायाचे गमक आत्मसात केले आहे.

बचत गटांतील अनेक महिलांनी आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण देऊन अधिकारी बनवले आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. जिल्हाधिकारी पुजार यांनी रेशीम शेती, पशुपालन, फळ प्रक्रिया उद्योग उभारण्याचे आवाहन केले. धाराशिव मागास जिल्हा असला तरी येथील एका उद्योजकाने 'धाराशिव शेळी' च्या मटणाला जागतिक स्तरावर नेले आहे. याचा आदर्श घेऊन इतर क्षेत्रातही प्रगती साधावी, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात यशस्वी महिलांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



उत्कृष्ट उद्योजक : तृप्ती पेठे, प्रज्ञा खंडाळकर, ज्योती गुरव, मंदा लांडगे, प्रमिला देशमुख, लतिका क्षीरसागर, हिना शेख, जुलैखा शेख, प्रेमा हावळे. उत्कृष्ट सीआरपी : पूजा पवार, वंदना क्षीरसागर, वंदना सुर्यवंशी, दीपाली माने. आदर्श माता : कल्पना देशमुख, शालिनी गायकवाड, संगीता अदाने, निर्जला तेरकर, रेखा सुरवसे. उत्कृष्ट गट : सद्गुरु, हिरकणी, अफसाना, प्रगती, अक्षरा, श्री, शांकभरी, अलिषा, शिवपार्वती जनाई, श्री गुरुदत्त, मौलाना, पंचशील महिला बचत गट. उत्कृष्ट स्टाफ : संगीता घोडके.

संयुक्तदायित्व गट : ईश्वरी, अमृततुल्य, पुष्पा, गौरी नंदन, संजीवनी, महालक्ष्मी, श्री गुरुदेव.

या कार्यक्रमास महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक एस.बी. चिंचोलकर, नाबार्डचे जिल्हा प्रबंधक चैतन्य गोखले, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे, मराठवाडा विभागीय सल्लागार संदीप मराठे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस.बी. चिंचोलकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा एडके यांनी केले तर आभार अमर बनसोडे यांनी मानले. सुमारे दीड हजार महिला या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती अभियानास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती अभियानास ३ सप्टेंबर २०२५ रोजी सुरुवात झाली असून हे अभियान ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन कळंब तालुक्यातील प्रा.आ.केंद्र शिराढोण येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विनयशिल कुलकर्णी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत बनसोडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जे.एन. सय्यद यांच्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३० वर्षांवरील नागरिकांची मौखिक कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी केली जाणार आहे. प्रत्येक परिमंडळास एक कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेचा उद्देश ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये कर्करोगाबाबत जनजागृती करणे तसेच आजाराचे निदान सुरुवातीच्या टप्प्यात करून योग्य उपचार उपलब्ध करून देणे हा आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळावे; नळदुर्ग येथील बैठकीत ठराव

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

बंजारा समाजाची आरक्षणाची मागणी ही अनेक दशकांपासून प्रलंबित असून, समाजाचा हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करावा, अशी ठाम भूमिका नळदुर्ग येथील बैठकीत मांडण्यात आली.

श्री संत सेवालाल महाराजांचे वंशज श्री शेखर महाराज यांनी या बैठकीत मार्गदर्शन करताना समाज बांधवांना आवाहन केले की, समाजाच्या पुढील पिढीच्या भवितव्यासाठी मतभेद विसरून एकत्र या. समस्त बंजारा बांधवांनी केवळ समाजहितासाठी एकजूट दाखवावी.

बैठकीत सांगण्यात आले की, संत श्री रामराव महाराजांनी तत्कालीन पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांकडे आरक्षणासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. काही राज्यांत बंजारा समाज अनुसुचित जमाती (एसटी) प्रवर्गात आहे, तर काही ठिकाणी ओबीसी व महाराष्ट्रात व्ही.जे.एन.टी. प्रवर्गात समाविष्ट आहे.

अद्याप समाजाचे मुलभूत प्रश्न न सुटल्याने समाज काबाडकष्ट करत आहे. ऊसतोड, वीटभट्टी व बांधकाम मजुर म्हणून समाज जगतो आहे. त्यामुळे एसटी आरक्षणाची गरज अत्यंत महत्त्वाची आहे, असेही शेखर महाराज यांनी सांगितले.

बैठकीत एकमताने ठराव करण्यात आला की, दि. १७ सप्टेंबर रोजी पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांना निवेदन दिले जाणार आहे. तसेच, ग्रामपंचायतींनी स्वतंत्र ठराव करून तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे शासनाकडे पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले.

सरकारने बंजारा समाजाच्या मागण्या मान्य करून समिती गठीत करावी, ऐतिहासिक हैदराबाद गॅझेट व सन १८८१ ते १९४१ च्या जनगणनेतील नोंदी तपासून एसटी प्रवर्गाचा शासन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलनाचा इशारा बैठकीत देण्यात आला.

या बैठकीस निवृत्त नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण, तांडा समृद्धी योजनेचे सदस्य प्रवीण पवार, बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, डॉ. सुरज चव्हाण, माजी नगरसेविका छमाबाई राठोड, ॲड. राज राठोड, कवी गुलाबदास चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित होते.

## कर्मवीर गणेश मंडळाचा बंगल्याचा राजा उत्सवात भक्तिमय वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ सप्टेंबर -**

वाशी तालुक्यातील कर्मवीर गणेश मंडळाचा बंगल्याचा राजा हा उत्सव ठरलेला ठिकाण ठरला आहे. १९८४ पासून कर्मवीर युवक मंडळाने स्थापन केलेल्या या गणेश मंडळाचे सध्याचे नेतृत्व नवीन पिढी करत आहे. मंडपाची सुंदर सजावट, कारंजे, झुंबर, विद्युत रोषणाई आणि विविध प्रकारची फुलझाडे भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत.

गणेश मंडळाचे अध्यक्ष संकेत गायकवाड असून, दररोज भागवत कथा, महाआरती आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सकाळ व संध्याकाळ आरतीसह भक्तिमय वातावरणात गणेश भक्त आणि महिला सहभागी होतात.

या वर्षी वाशीमध्ये अनेक नवीन गणेश मंडळांची स्थापना झाली, परंतु फक्त दोन मंडळांनी मिरवणूक काढून विसर्जन केले, तर बाकी मंडळांनी अन्नदान करून गणेश विसर्जन केले. विशेष म्हणजे बालगणेश मंडळांनीही अन्नदानाद्वारे गणेश विसर्जन करत उत्साह वाढवला होता.

## कुंभारी येथे शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा गुणगौरव सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.८ सप्टेंबर -**

विद्यार्थ्यांतील आंतरिक प्रतिभा, क्षमता, गुण ओळखून त्यांच्यातील शिकण्याची उत्सुकता आणि नवीन ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा यांचा विचार करूनच शिक्षकांनी अध्यापन केले पाहिजे, असे प्रतिपादन धाराशिव जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी मल्हार माने यांनी केले.

ते तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथे वसंतभारती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे शिक्षक दिनानिमित्त आयोजित शिक्षक गुणगौरव समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षाराणी वडणे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी अर्जन जाधव, बालकल्याण समिती अध्यक्ष विजयकुमार माने, संस्थेच्या अध्यक्षा ॲड. मैना वडणे, शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रकांत चिलवंते, केंद्रप्रमुख संजय वाले, हनुमंत कदम, ॲड. विष्णू डोके, खंडू कुंभार यांची उपस्थिती होती. मल्हार माने पुढे म्हणाले की, शिक्षक, बालक आणि पालक यांच्यातील सुसंवाद ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्याला महत्त्वाचे स्थान आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद काळुंके, सूत्रसंचालन विठ्ठल नरवडे यांनी तर आभार प्रदर्शन सुहास वडणे यांनी केले. कार्यक्रमासाठी विठ्ठल वडणे, राऊ पाटील, रुक्मीणी वडणे, ॲड. सुजाता माळी, अनिता काळुंके, व्यंकट वडणे, वैभव वडणे आदींनी विशेष प्रयत्न केले.

### यांच्या झाला यावेळी सन्मान...

यावेळी सुहास भोसले, रामराज भड, अब्दुलमज्जीद शेख, सागर मोहिते, सावता माळी, अमोल मगर, रमेश सोनवणे, गायत्री ताकमोगे, प्रविण जाधव, अमोल गायकवाड, विजयकुमार गायकवाड, इरशाद शेख, वासंती गायकवाड, विठ्ठल गावीत, पोपट सुरवसे, केदारी इंगळे, नागनाथ वडणे, सुहास वडणे या शिक्षकांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, फेटा पुष्पहार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**वाशी, दि.८ सप्टेंबर -**

वाशी पोलीसांनी जुगार विरोधी कारवाई करत लांजेश्वर येथील मंदिरात छापा टाकून संतोष मच्छिंद्र कदम व सहा जणांना रंगेहात पकडले. पोलिसांनी तिरट मटका जुगाराचे साहित्य व १,०५० रूपये रोख रक्कम जप्त केली. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## जयप्रकाश विद्यालयात शिक्षक दिन व साक्षरता दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे दि.८ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन व साक्षरता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शिक्षकांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य दयानंद जटनुरे (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव), धनंजय रणदिवे व डॉ. शिंदे सर उपस्थित होते.

प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी प्रास्ताविक करताना शिक्षक दिन व साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्ष सुभाषदादा कोळगे यांनी आपल्या मनोगतात शिक्षक हे विद्यार्थ्यांचे आदर्श असून त्यांच्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होत असल्याचे सांगितले. धनंजय रणदिवे यांनी ग्रामीण भागातील शिक्षणविकासात दादांचे योगदान अधोरेखित केले. तर प्राचार्य दयानंद जटनुरे यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड वाढवून इतरांनाही वाचायला शिकवावे, असे आवाहन केले. या प्रसंगी विद्यालयातील माजी विद्यार्थी अभय घोडके (सेट परीक्षा उत्तीर्ण) व लिंबराज वडवले (समाज कल्याण अधिकारी, बीड) यांचा सत्कार शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजनारायण कोळगे, विविध मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश शेटे व सचिन कांबळे यांनी केले तर आभार काकासाहेब डोंगरे यांनी मानले.

# युवा महोत्सव ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे : डॉ. विजय फुलारी

## जवाहर कॉलेज वर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.८ सप्टेंबर -**

प्रत्येक प्राध्यापकांनी वर्गात आत्मीयतेने शिकवलेच पाहिजे, अणदूर मध्ये असलेलं जवाहर कॉलेज, हे ग्रामीण विद्यार्थ्यांचे फार मोठे आधारस्तंभ असून,आलूरे गुरुजींनी ग्रामीण भागात जवाहर कॉलेज काढून ग्रामीण भागातील मुलींची उच्च शिक्षणाची खऱ्या अर्थाने सोय केली असून, गुरुजींचे स्वप्न साकार होण्यासाठी ग्रामीण भागात एवढा मोठा युवा महोत्सवाचे आयोजन आज इथे होत आहे. ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी केले.

ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व जवाहर महाविद्यालय अणदुर आयोजित धाराशिव जिल्हा युवा महोत्सवाचे उदघाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदुरचे सचिव रामचंद्र आलुरे, प्रमुख अतिथी म्हणून सिने अभिनेता, टी.व्ही.स्टार उमेश जगताप, जवाहर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. लक्ष्मीकांत पाटी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक, डॉ.कैलास अंभुरे, जिल्हा समन्वयक प्राचार्य डॉ. संदीप देशमुख, सिनेट सदस्य डॉ. भास्कर साठे, डॉ. सतीश गावित यांची प्रमुख उपस्थिती होती.

शोभायात्रेने युवा महोत्सवाची सुरुवात झाली. ग्रामदैवत खंडोबाच्या मंदिरापासून जवाहर महाविद्यालयापर्यंत विविध महाविद्यालयातील संघांनी या शोभायात्रेत सहभाग नोंदविला, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीवरती थाप द्या. त्यांना विश्वासात घेऊन संस्कार करा. असे आवाहन ही त्यांनी या प्रसंगी केले.

सिने अभिनेते उमेश जगताप म्हणाले की, तुळजापूरच्या मातीने मला भरपूर दिले आहे. या मातीत मी जन्मलो, घडलो तुम्हीही घडा. युवा महोत्सव आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. यामुळे जीवनाला कलाटणी मिळते. बक्षीस का मिळाले? का मिळाले नाही? याचाही विचार करा. आज तरुणाई मोबाईलच्या विळख्यात सापडलेली आहे. यातून बाहेर पडा, परिस्थिती जशी आहे तशी स्वीकारा, पुढे जा. तर अध्यक्ष समारोप करताना रामचंद्र दादा आलुरे म्हणाले की, जीवनात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चेहरा कोणी पाहत नाही, कला पाहत असतात. कोणत्याही मानपत्राची अपेक्षा न करता कर्म केल्यास यश निश्चित प्राप्त होतो.



प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. तर विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, कैलास अंभुरे यांनी युवा महोत्सव आयोजनाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पवार व भैरवनाथ कानडे यांनी केले. आभार डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मानले.

या उद्घाटन समारंभासाठी धाराशिव जिल्ह्यातील ४५ महाविद्यालयाचे संघप्रमुख, कलाकार तसेच धाराशिव जिल्ह्यातील महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, आणदूर पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला धाराशिव जिल्ह्यातील ४५ महाविद्यालयांचे संघप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, कलाकार तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपालिकेचा भोंगळ कारभार; आवक-जावक विभाग बंद, नागरिकांची गैरसोय





तभा वृत्तसेवा

कन्नड-दि. ८ सप्टेंबर - कन्नड नगरपालिकेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून त्याचा त्रास मात्र सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. दि. ८ सोमवार हा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने शहरातील नागरिक विविध कार्यालयीन कामांसाठी नगरपालिकेत दाखल झाले होते. विशेषतः जन्म-मृत्यू दाखले, शासकीय पत्रे व अन्य महत्त्वाची कागदपत्रे सादर करण्यासाठी आवक-जावक विभागावर मोठी गर्दी झाली होती; परंतु ऐन वेळेस हा विभाग बंद असल्याने नागरिकांचे कामे रखडली.

जन्म दाखला जमा करण्यासाठी सकाळपासून अनेक नागरिक नगरपालिका कार्यालयात थांबले होते. प्रस्ताव सादर करून टोकन घेणे आवश्यक असताना संबंधित विभाग बंद असल्याने नागरिकांना पुढे कोणाकडे जावे हे समजत नव्हते. यामुळे नागरिकांचा वेळ वाया गेला असून अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या.

आसिफ खान या नागरिकाने सांगितले, जन्म दाखले जमा करण्यासाठी मी सकाळपासून नगरपालिका येथे येऊन थांबलो होतो; पण इथे दाखले जमा करण्यासाठी कोणीच नव्हते.

नागरिक संतप्त झाल्यानंतर सायंकाळी चार वाजता पर्यायी कर्मचाऱ्यांनी पुढील कार्यवाही हाती घेतल्याने कामे मार्गी लागली. मात्र, मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांची गैरसोय टाळावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## होमिओपॅथिक डॉक्टर्ससाठी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीचा मार्ग मोकळा

छत्रपती सभाजीनगर - राज्यातील होमिओपॅथिक डॉक्टर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करण्याचा मार्ग अखेर खुला झाला आहे. या निर्णयामुळे होमिओपॅथिक क्षेत्रातील डॉक्टर्सना नवे दालन खुले होणार असून रुग्णसेवेला नवी दिशा मिळणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयामागे महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेचे प्रशासक डॉ. बाहुबली शाह, डॉ. रजनीताई इंदुलकर आणि डॉ. बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखालील सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

या प्रक्रियेत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, तसेच वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळेच हा मार्ग मोकळा झाला.

राज्यातील होमिओपॅथिक संघटनांचे पदाधिकारी व अनेक अग्रणी डॉक्टर्स सुरुवातीपासून सक्रिय राहिले. त्यामध्ये विशेषतः डॉ. अरुण भस्मे डॉ प्रकाश झांबड, डॉ हरीश नागतकर डॉ. एस. पी. नेमाने (जालना), श्री. विनोद मंत्री (परभणी), डॉ. पी. एम. दरक (लातूर) , डॉक्टर परेश नवलकर, दीपक मोटेनांदेड, डॉ तात्या कोकाटे उस्मानाबादयांचे, डॉ.राजेश तातेड , डॉ अजय गुजराथी, डॉ.प्रतीक तांबे, यांचे कार्य उल्लेखनीय आहे. डॉ. प्रकाश झांबड यांची भूमिकाही महत्त्वाची या विषयावर सातत्याने प्रभावी भूमिका बजावणारे डॉ. प्रकाश झांबड (माजी उपाध्यक्ष, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी) यांचे योगदान देखील अधोरेखित करावे लागेल.

होमिओपॅथी क्षेत्रासाठी ऐतिहासिक टप्पा

या निर्णयामुळे हजारो होमिओपॅथिक डॉक्टर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीची संधी उपलब्ध होणार आहे. हा टप्पा होमिओपॅथिक क्षेत्राच्या विकासासाठी आणि रुग्णांच्या हितासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

## राजकुंवर महाविद्यालयात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी



फर्दापूर दि ८ : राजकुंवर महाविद्यालयात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए जे बेडवाल सर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक जी एस पाटील यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

या प्रसंगी वक्त्यांनी आपल्या भाषणातून उमाजी नाईक यांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे सांगितले. क्रांतिवीर उमाजी नाईक यांनी इंग्रजांच्या विरोधात शौर्याने लढा देऊन स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित केली होती, याची आठवण करून देण्यात आली. मान्यवरांनी क्रांतिवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.सूत्रसंचालन प्रा. एम पी सपकाळे यांनी केले यावेळी वाय आर पाटील, शेळके, चव्हाण,आदि उपस्थित होते.शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जयपूर रग्सचा रग उत्सव २०२५

मुंबई - हस्तकला आणि सामाजिक उद्योजकतेचे जागतिक प्रतीक असलेले जयपूर रग्ज ३ सप्टेंबरपासून सर्जनशीलता, संस्कृती आणि प्रभावाचा भव्य उत्सव, रग उत्सव घेऊन येत आहे. या वर्षीची आवृत्ती इतर कोणत्याही आवृत्तीपेक्षा वेगळी आहे, ज्यामध्ये १४,००० हून अधिक हस्तनिर्मित रग्जांचा आश्चर्यकारक संग्रह प्रदर्शित केला आहे जो आजच्या डिझाइनसह भारताच्या विणकाम परंपरेच्या आत्म्याला सुंदरपणे मिसळतो.या वर्षीच्या क्युरेशनमध्ये आलम, जेनेसिस, सवाना, कॉन्कोक्शन, दा हास, वंडरकॅमर, कॅलिडो, क्लॅन, बेसिस, लॅकुना, एर्बे, इंडसबार, नोमॅडिक थ्रेड्स, आकार आणि कॉन्टूर असे स्वाक्षरी संग्रह आहेत. या महोत्सवाचे आकर्षण म्हणजे पुरस्कार विजेत्या मंचहा संग्रहातील जवळजवळ २०० अद्वितीय गालिचे, जे ग्रामीण कारागिरांच्या कल्पनेतून थेट विणलेले आहेत, प्रत्येक गालिचा वैयक्तिक आणि गहन कथा सांगतो.

### अनोख्या निर्मितीपासून ते शंभर वर्षे जुन्या प्राचीन वस्तूंपर्यंत

पुणे : या वर्षीची आवृत्ती इतर कोणत्याही आवृत्तीपेक्षा वेगळी आहे, ज्यामध्ये १४,००० हून अधिक हस्तनिर्मित रग्जांचा आश्चर्यकारक संग्रह प्रदर्शित केला आहे जो आजच्या डिझाइनसह भारताच्या विणकाम परंपरेच्या आत्म्याला सुंदरपणे मिसळतो. या वर्षीच्या क्युरेशनमध्ये आलम, जेनेसिस, सवाना, कॉन्कोक्शन, दा हास, वंडरकॅमर, कॅलिडो, क्लॅन, बेसिस, लॅकुना, एर्बे, इंडसबार, नोमॅडिक थ्रेड्स, आकार आणि कॉन्टूर असे स्वाक्षरी संग्रह आहेत. या महोत्सवाचे आकर्षण म्हणजे पुरस्कार विजेत्या मंचहा संग्रहातील जवळजवळ २०० अद्वितीय गालिचे, जे ग्रामीण कारागिरांच्या कल्पनेतून थेट विणलेले आहेत, प्रत्येक गालिचा वैयक्तिक आणि गहन कथा सांगतो. संग्राहकांसाठी, रग उत्सव २०२५ एक दुर्मिळ संधी घेऊन येतो: २००० विंटेज रग्ज (३०-५० वर्षे जुने) आणि २५० अँटीक रग्ज (१०० वर्षांहून अधिक जुने). यामुळे हे त्याच्या प्रकारचे सर्वात मोठे रग्ज प्रदर्शन बनते.

## कोरोमंडल इंटरनॅशनलने सुरू केले आपले १००० वे ग्रोमोर रिटेल केंद्र

अहिल्यानगर: भारतामधील अग्रगण्य कृषी-उपाय पुरवठेदारांपैकी एक असलेल्या कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेडने महाराष्ट्रातील पुणे (काष्टी-अहिल्यानगर) येथे आपले १००० वे ग्रोमोर रिटेल केंद्र सुरू करून एक महत्त्वाचा मैलाचा टप्पा गाठला. 'आपलं ग्रोमोर' केंद्र हे कोरोमंडलच्या भारतातील शेतकरी समुदायाशी असलेल्या वाढत्या संबंधांचे आणि या प्रदेशातील वाढत्या उपस्थितीचे प्रतीक आहे.या महत्त्वपूर्ण सोहळ्याला श्री. अरुण अळगप्पन- कार्यकारी अध्यक्ष आणि श्री. एस. शंकरसुब्रमणियन- व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड, तसेच कंपनीच्या वरिष्ठ नेतृत्व टीमने उपस्थिती लावली.कोरोमंडलने ग्रामीण रिटेल क्षेत्रात २००७ साली माय ग्रोमोर या ब्रँडखाली प्रवेश केला आणि त्यानंतर दक्षिण भारतीय राज्यांतील शेतकरी समुदायाला विविध कृषी उत्पादने व सेवा पुरवणारी देशातील सर्वात मोठ्या ग्रामीण रिटेल साखळ्यांपैकी एक म्हणून आपली ओळख निर्माण केली.

## अ ग्लोबल सोर्सिंग हब'२४ सप्टेंबर रोजी मुंबई येथे

छत्रपती संभाजीनगर- जागतिक प्लास्टिक व्यापारात भारत निर्णायक उडी घेण्यासाठी सज्ज आहे. मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड या ध्येयदृष्टीखाली, ऑल इंडिया प्लास्टिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ने पुढील तीन वर्षांत भारतातील प्लास्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट्सच्या निर्यातीला चौपट वाढवण्याची महत्वाकांक्षी रणनीती जाहीर केली आहे. तसेच २४ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची घोषणाही करण्यात आली. एआयपीएमए च्या गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन श्री. अरविंद मेहता म्हणाले, हा फक्त व्यापार विस्तार नसून, भारताला जागतिक प्लास्टिक हब बनवण्याचा राष्ट्रीय मिशन आहे. श्री. मेहता यांनी सांगितले की, जागतिक प्लास्टिक फिनिश्ड वस्तूंचा व्यापार सुमारे १,३०० अब्ज डॉलर्स इतका आहे, परंतु भारताचा हिस्सा केवळ १२.५ अब्ज डॉलर्स म्हणजेच एकूण ०.९६% इतका आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेत एकट्याने ७२.३५ अब्ज डॉलर्स किमतीची प्लास्टिक उत्पादने आयात केली जातात, परंतु त्यात भारताचा वाटा फक्त १.२% आहे. योग्य धोरणांमुळे २-३ नवीन पॉलिमर प्लांट्स, प्लास्टिक मशिनरी व सहयोगी युनिट्समध्ये १००% वाढ, एमएसएमई-आधारित उत्पादनात मोठी भर पडू शकते. रोजगार व कौशल्यविकासात भर पडेल.

## एमजीएममध्ये 'इंडस्ट्री इनसाइट सीरीज' अंतर्गत व्याख्यान संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयात 'इंडस्ट्री इनसाइट सीरीज' अंतर्गत इन्फिसोल एनर्जीचे संचालक रमन लड्डा यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. लड्डा यांनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

भारताच्या स्वच्छ उर्जेच्या प्रवासात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करताना श्री. लड्डा यांनी सांगितले की, सौरऊर्जा क्षेत्रात केवळ वीज निर्मितीच नाही तर उत्पादन, प्रकल्प अंमलबजावणी, कन्सल्टिंग आणि देखभाल यासारख्या विविध क्षेत्रांत तरुण अभियंते व उद्योजकांसाठी प्रचंड संधी निर्माण होत आहेत. सक्षम धोरणात्मक पाठबळ आणि झपाट्याने होत असलेली तांत्रिक प्रगती यामुळे नवीकरणीय ऊर्जा हे सर्वाधिक आशादायी क्षेत्र ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री. लड्डा यांनी दिलेल्या साध्या उदाहरणांतून विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षण व प्रत्यक्ष सौरऊर्जा प्रकल्प यांचा थेट संबंध किती महत्त्वाचा आहे हे समजण्यास मदत झाली. पुढे बोलताना ते म्हणाले की, आज आपण प्रयोगशाळेत जे शिकत आहात, तेच शिक्षण उद्या भारताच्या शाश्वत उर्जेच्या प्रवासाचा भाग होणार आहे.

कार्यक्रमास विद्युत व संगणक अभियांत्रिकी विभागातील डॉ.एस.ए.नाविद व यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ.एम.एस.कदम यांनी मान्यवरांचे स्वागत केले. संजना पाटकी यांनी सूत्रसंचालन केले तर श्लोक नोवाल यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.योगेश बारोकर, डॉ.गणेश शिंगाडे, अमनकुमार पांडे, श्रावणी कुलकर्णी, दिवेश तनवाणी, आरती राऊलवार आणि मोईज शेख यांनी आपले योगदान दिले.

## जि.प.प्रा.शा.जंगलातांडा येथे शालेय समितीच्या अध्यक्षपदी सपनाबाई चव्हाण तर उपाध्यक्षपदी विनोद राठोड



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.८ सप्टेंबर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा ता.सोयगाव येथे दि.४ रोजी दयाराम राठोड यांच्या अध्यक्षते खाली शाळा व्यवस्थापन समिती निवड प्रक्रिया पार पडली

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी,प्रशांत पाटील उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक रामदास फुसे यांनी शाळा व्यवस्थापन समिती ची रचना तसेच शाळा व्यवस्थापन समितीचा उद्देश पालकांना समजावून सांगितला.

त्यानंतर प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांना प्राधान्य देत वर्गानुसार आरक्षणनिहाय निवड प्रक्रिया राबवण्यात आली.या निवड प्रक्रियेत शालेय समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते सपनाबाई चव्हाण यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी विनोद राठोड यांची निवड झाली.समितीचे इतर सदस्य सोनाली चव्हाण,राजू लाड,मायाबाई राठोड,सपनाबाई चव्हाण,विनोद राठोड,सुनीताबाई चव्हाण,संगीताबाई चव्हाण,संजय कल्याणकर,संत्रीबाई चव्हाण,रामसिंग राठोड (शिक्षण तज्ञ)यांचा समावेश करण्यात आला.नवीन समितीकडून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शाळेतील शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देण्यात आले.

स्थानिक ग्रामस्थ,पालक व शिक्षकांनी नव्या समितीला शुभेच्छा दिल्या.तसेच मागील शाळा व्यवस्थापन समितीने सुद्धा उत्कृष्ठ कामं केल्यामुळे शाळेची भरभराट झाली.त्या काळात शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियात दोनवेळा तालुक्यातील द्वितीय व प्रथम क्रमांकचे पारितोषिक मिळाले होते.तसेच शाळेचे संपूर्ण रूप बदलून गेले व जंगलातांडा ता.सोयगाव येथील शाळा जिल्ह्यात नावारूपाला आली. त्यांच्या या उत्कृष्ट सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांनी पालकांना शाळा व्यवस्थापन समितीच्या जबाबदारी बद्दल मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनार सर यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक रामदास फुसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी प्रयत्न केले.

## पर्यावरणाचे रक्षण हेच जीवनाचे संरक्षण; समाज प्रबोधनकार विष्णू मापारी



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.८ सप्टेंबर

प्रत्येक नागरिकांनी प्लास्टिक वर बहिष्कार टाकून वन संवर्धनाचा स्वीकार करावा. देशी झाडे लावल्याने आपल्याला ऑक्सिजन (प्राणवायु ) व्यवस्थित मिळतो पर्यावरणाचे रक्षण हेच जीवनाचे संरक्षण असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर यांनी एसटी बसआगार येथे श्री गणेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक आगार प्रमुख मनीष जवळेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून युवक कार्यकर्ते हरीश सोहनी उपस्थित होते.वाहक संतोष पाखरे यांनी समाजप्रबोधनकार विष्णू मापारी व हरीश सोहनी यांचे पुष्पहार देऊन स्वागत केले.पुढे बोलताना समाज प्रबोधनकार म्हणाले की प्लास्टिकच्या वापराने पर्यावरणाला धोका निर्माण होतो.प्लास्टिक पिशव्यांना नाही म्हणा,कापडी,कागदी पिशव्या वापरा आपल्या छोट्या बदलामुळे मोठा फरक पडून आपले गाव आजुन स्वच्छ सुंदर होईल,चला प्लास्टिक मुक्त जीवनशैली स्वीकारू या आणि अस्वच्छतेवर मात करूया असे सांगताना त्यांनी एसटीचा प्रवास सुखी प्रवास असुन प्रत्येकाने एसटी ने च प्रवास करावा.नागरीकांनी चालक व वाहकाशी विनाकारण वाद घालु नये.तनाव मुक्त व व्यसनमुक्त जीवन महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. श्री गणरायाच्या मुर्तीचे विसर्जन करतांना आदरपूर्वक करावे . कार्यक्रमास गावकऱ्यांसह वाहक संतोष पाखरे,विजय काळे,शिवाजी बिरारी,पृथ्वीराज हजारी,राणीदास चव्हाण, अण्णासाहेब ढेपले,अशोक तायडे,यांचे सह अनेक गावकरी उपस्थित होते.

## पर्युषण पर्वातील उपवास धारकांची भव्य शोभा यात्रा व शाही पारणा महोत्सव संपन्न. हजारो भाविकांची उपस्थिती



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री.खंडेलवाल दिगंबर जैन समाजात अनन्य साधारण महत्व असलेल्या दहा दिवसीय पर्युषण पर्वाच्या शेवटच्या दिवशी आज सकाळी दहा,आठ उपवास करणा-या उपवास धारकांची भव्य शोभायात्रा सकाळी आचार्य डॉ.प्रणामसागरजी गुरैदेव ससंघ यांच्या सानिध्यात सकाळी ८ वाजता राजाबजार जैन मंदिरातुन काढण्यात आली.शोभायात्रेत जवळपास ७५ भाविक महिलांनी,लहान मुलीनी,मुलांनी,पुरैषांनी उपवासाची संकल्पना केली. छत्रपती संभाजीनगर शहरात एवढया मोठया संख्येची उपवासाची संकल्पना करण्यात आली ही संकल्पना फक्त आचार्य प्रणामसागरजी गुरुदेव व उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांच्याच आशीर्वादाने शक्य झाली असल्याचे चित्र यावेळी दिसत होते. सकाळी ठिक ८ वाजता शोभायात्रेस राजाबजार जैन मंदिरातुन सुरवात झाली शोभायात्रेत सर्वप्रथम फुलांनी सजवुन आलेल्या बग्यांन (घोडा गाडी) मध्ये सर्व उपवास धारकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती शोभायात्रा जैन मंदीर,किराणाचा वडी,शहागंज,संस्थान गणपती चौक,नवाबपुरा या मार्गाने जावुन श्री.हिराचंद कस्तुरचंद कासलीवाल प्रांगण आचार्य गुप्तीनंदीगुरैदेव सभागृहात विसर्जीत करण्यात आली.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, किरण पहाडे, महावीर ठोले, यतीन ठोले, ललीत पाटणी, अरूण पाटणी, संतोष सेठी, जितेंद्र पाटणी, निता ठोले, चंदा कासलीवाल, चातुर्मास कमिटी अध्यक्ष अनिल कासलीवाल, महामंत्री प्रमोद पांडे, संजय पहाडे अप्पु पाटणी, विपीन पांडे, अजित लोहाडे, सपना पापडीवाल, दिनेश ठोले, डॉ.प्रकाश पापडीवाल, बापु कासलीवाल,प्रमोद ठोले, प्रसाद पाटणी, किरण गंगवाल, प्रमोद पाटणी श्रेणीक कासलीवाल राजकुमार गगवाल , निकेतन कासलीवाल, काश्मीरा लोहाडे, सुरेखा पाटणी, मनिषा पाटणी शैलेश पहाडे राजकुमार पाडे वैशाली पहाडे शैलेश चादीवाल आदीच्या सहकार्याने पारणा उत्साहात संपन्न झाला.

## नवगाव येथे महिलेची आत्महत्या, पतीसह चौघांवर गुन्हा दाखल.

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०८ :- पैठण तालुक्यातील नवगाव य गावातील २६ वर्षीय विवाहितेने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी ईद ए मिलाद च्या दिवशी घडली. याप्रकरणी पैठण पोलीसत मयाताच्य भाऊ ने दिलेल्या फिर्यादनुसार मयताचे पती, सासू, सासरा, दिर आणि जाऊ या पाच जणांविरुध्द पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गर्शनाखाली विविध कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबत अधिक माहिती नुसार नवगाव येथील सिद्दीक इलियास पठाण यांच्या सोबत फिर्यादीची बहीण फतिमा हीचा विवाह झाला होता. आरोपींकडून मेडिकल टाकण्यासाठी तसेच शिक्षकाच्या नोकरीला लागण्यासाठी मयतला ११ लाखांच्या मागणी करण्यात आली होती. यासाठी तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात येत होता.तसेच आरोपींकडून तिच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेतल्याने तिने त्रासाला कंटाळून शुक्रवारी सकाळी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी पती सिध्दीक पठाण, सासू रजियाबी पठाण, सासरा ईलीयास पठाण, दिर इद्रीस पठाण, जाऊ रूखैबी पठाण यांच्या विरुद्ध भारतीय न्याय सहिंता १०८,८०,८५,११५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गर्शनाखाली घटनेचा तपास पोलिस उप निरीक्षक सारंग हे करीत आहे.

## राजकुंवर महाविद्यालयात क्षमा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

फर्दापूर : राजकुंवर महाविद्यालयात क्षमा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए जे बेडवाल सर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी क्षमा, अहिंसा व सौहार्द या मूल्यांवर भाषणे करून क्षमेचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्यावर अन्याय केलेल्या व्यक्तीला राग, द्वेष किंवा सूड न बाळगता मनापासून माफ करणे. ही केवळ दुसऱ्याला दिलेली माफी नसून स्वतःच्या मनालाही दिलेली शांती असते. हा संदेश देत समाजात एकतेची भावना रुजविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी क्षमागुण अंगीकरण्याचा संकल्प केला.मान्यवरांनी क्षमेच्या विचारांचा स्वीकार करण्याचे आणि दैनंदिन जीवनात त्याची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## श्री मोहटादेवी विद्यालयात शिक्षण महर्षी अशोक मुखेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ८ सप्टेंबर - पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे कैलासवासी अशोक मुखेकर सर यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सरांच्या कार्याचा गाडा पुढे चालू ठेवण्यासाठी सगळ्यांनी प्रतिज्ञा घेतली. यावेळी गवई सुभाष,दीपक कर्डिले, अंजुम पठाण, ज्योती गायकवाड सतीश मुखेकर, शंकर शिरसाट, बद्रीनाथ दरपळे ,यांनी कार्यक्रमासंबंधी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पठाण मॅडम तर आभार प्रदर्शन गवई सर यांनी मानले. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. कार्यक्रमासाठी प्राचार्य घोरतळे महेश, बेस्ट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ धनंजय मुखेकर, बेस्ट शिक्षण संस्थेच्या सचिव वंदना मुखेकर, यांनी भाववंदना वाहिली यावेळी शाळेचे सल्लागार विश्वनाथ धरपळे यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

## जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्री.एन.आर. ढोके साहेब,) यांच्या कोर्टात.**

दिवाणी अर्ज क्र- ४२५/२०२५ पु. तारीख - १०.१०.२०२५

अर्जदार : १. शेती, रा. शिवराई ता. कन्नड जि. औरंगाबाद प्रकाश पिता खंडु घुगे, वय् ५४ वर्षे, धंदा २. घरकाम, रा. शिवराई ता. कन्नड जि. औरंगाबाद शांताबाई भ्र. भास्कर नागरवय ७० वर्षे, धंदा ३. घरकाम, रा. डोणगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद कांताबाई विश्वनाथ वाघ, वय ५२ वर्षे, धंदा

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

अर्ज :-वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी ॲड. यु.ए.वारे कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत बायजाबाई खंडु घुगे हे अर्जदार नं. १ ते ३ यांची आई आहे मयत बायजाबाई खंडु घुगे हया आजार पणाने दि.१५.०७.२०२४ रोजी मौजे शिवराई ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदारांचे वडील म्हणजेच मयत बायजाबाई घुगे यांचे पती नामे मयत खंडु शेकु घुगे हे सुध्दा दि. २४.०६.१९९० रोजी शिवराई येथे मयत झाले आहे. मयत बायजाबाई खंडु घुगे हीस अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. बायजाबाई खंडु घुगे ह्या मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ३ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन
दिनांक ०८/०९/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड.

## नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर

(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक) (अवसायनांतर्गत) बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहिल्यानगर-४१४००१ Ph-0241-2343641 / 42

**जाहीर सुचना**

**सर्व ठेवीदार कर्जदार व ग्राहकांना कळविण्यात येते की नगर अर्बन को - ऑप. बँक लि. अवसयानात गेल्यामुळे बँकेच्या स्वमालकीच्या खाली दिलेल्या तक्त्यातील शाखा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.**

| बंद होणाऱ्या शाखेचे नाव | शाखेचा पत्ता | शाखा बंद होण्याची दिनांक | शाखा बंद झाल्यानंतर खालील शाखेतून सेवा मिळेल |
|---|---|---|---|
| जालना | राजेंद्र प्रसाद रोड, आदित्य कॉम्प्लेक्स, जालना, ता. जि.जालना ४३१२०३ | दि.: १०/१०/२०२५ | मुख्य शाखा अहिल्यानगर |

१) सर्व लॉकरधारकांना कळविण्यात येते की, त्यांनी त्वरित आपले लॉकर समर्पण करण्याची व्यवस्था करावी. दि. १०/१०/२०२५ पूर्वी लॉकर मधील आपले सामान मौल्यवान वस्तू आपल्या ताब्यात घेऊन खुल्या लॉकरची चावी बँकेकडे सुपूर्त करून सहकार्य करावे. लॉकर वेळेत बंद न झाल्यास बँकेच्या नियमानुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) शाखेतील सर्व थकीत कर्जदार व जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, आपल्या कर्ज खात्याची बाकी रक्कम भरून बँकेस सहकार्य करावे अन्यथा वृत्तपत्र व बँकेची अधिकृत वेबसाईट www.nucb.in वर संपूर्ण नाव व फोटोसहीत थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध केली जाईल. तसेच संबंधित कर्जदार व जामीनदार यांचे विरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच मानहानी झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही,याची नोंद घ्यावी.

३) सर्व खातेदार, ठेवीदार यांना कळविण्यात येते की, ज्यांनी अध्याप डीआयसीजीसी (DICGC) मार्फत दावे अर्ज अथवा आपले बँकेत शिल्लक रकमेबाबत दावे अर्ज भरून दिलेले नाहीत, त्यांनी त्वरित बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊन रीतसर दावे अर्ज क्लेम फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. तसेच आपल्या बँक खात्यांची केवायसी (KYC) पूर्तता करून घ्यावी.

अधिक माहितीसाठी बँकेची अधिकृत वेबसाईट www.nucb.in वर तसेच संबंधित शाखेतील शाखाधिकारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

(अवसायक)
नगर अर्बन को. ऑप.बँक लि.(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्रशासनाधिन अवसायानाअंतर्गत, अहिल्यानगर

तारीख : १०/०९/२०२५
ठिकाण - अहिल्यानगर

ARL

## अग्रलेख...

# एआय आणि मानव

काल तीन हजार काढले, आज हजार काढले, गेल्या महिन्यात पाच हजार काढले होते, पुढच्या महिन्यात दहा हजार काढणार... सध्या सॉफ्टवेअर उद्योगात कर्मचारी कपातीचीच चर्चा सुरू आहे. यातले प्रमुख कारण आहे ते आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता! एका बाजूला लाखो वर्षांच्या उत्क्रांतीचे फलित म्हणजे मानवी मेंदू... जीवशास्त्राचा चमत्कार, कल्पनाशक्ती, स्मृती, सर्जनशीलता आणि भावनांसह जगणारा. दुसरीकडे एआय- काही दशकांच्या मानवी नवोपक्रमाचे उत्पादन. गणित, अल्गोरिदम आणि डेटाद्वारे संचालित. मानवाने ते तयार केले, ते आता मानवाच्या नोकऱ्यांवर उठले आहे. पुढे ते जिवावर उठणार नाही का, अशीही भीती आहे. याच पृष्ठभूमीवर, एकेकाळी लाखो अभियंत्यांना नोकऱ्या देणाऱ्या आणि असंख्य कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या स्थिर बनवणाऱ्या सॉफ्टवेअर उद्योगाला अनपेक्षित आव्हानाचा सामना करावा लागत आहे. एआय टूल्सने कोडिंग, चाचणी, ग्राहक सेवा आणि अगदी सर्जनशील लेखनासारखे काम देखील करण्याची क्षमता दाखविल्याने अनेक कंपन्या कर्मचारी कमी करीत आहेत. वातावरण अनिश्चिततेने भरलेले आहे. प्रत्येक क्षेत्रात कपातीची भीती आहे. तशी तंत्रज्ञाने जगाला हादरवण्याची ही पहिलीच वेळ नाही. औद्योगिक क्रांतीपासून ते इंटरनेटच्या उदयापर्यंत, मानवजातीला वारंवार यंत्रांनी-तंत्रज्ञानाची आव्हाने पेलावी लागली. काही काळ मानव गोंधळला, पण लवकरच सावरला. मानवाने परिस्थितीशी जुळवून घेत नवीन शोध घेण्याचे आणि पुढे जाण्याचे मार्ग शोधले. त्या तुलनेत एआय ही मोठी क्रांती वाटू शकते. परंतु, इतिहास आपल्याला सांगतो की हा मानवी क्षमतेचा अंत नाही. किंबहुना एका नवीन अध्यायाची सुरुवात आहे. एआयच्या निमित्ताने अवतरलेल्या या काहीशा अप्रिय पर्वाकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे.

खरे तर विचार करणारी यंत्रे तयार करण्याचे स्वप्न पौराणिक कथांइतकेच जुने आहे. प्राचीन ग्रीक लोकांनी एक यांत्रिक नोकर बनवण्याची कल्पना केली होती. भारतीय ग्रंथांमध्ये यंत्रांबद्दल सांगितले आहे. १९५० मध्ये एका शास्त्रज्ञाने प्रश्न विचारला होता की, 'यंत्रे विचार करू शकतात का?' त्या प्रश्नाचे उत्तर लगेच मिळाले नाही. यंत्रे काम करीत होती, पण त्यांना कामाला लावण्याची जबाबदारी मानवाकडेच होती. आता यंत्रे विचार करू शकतील, असे दिसू लागले आहे. कारण एआयच्या निमित्ताने त्याची प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. २०१० पासून पुढे मशीन लर्निंग आणि डीप लर्निंगने मोठे यश मिळवले. संगणकांनी मोठ्या प्रमाणात डेटामधून पॅटर्न शिकण्यास सुरुवात केली. भाषण ओळख, प्रतिमा ओळख, शिफारस प्रणाली सर्व काही विकसित झाले. बुद्धिबळ खेळणाऱ्या संगणकापासून ते चॅटजीपीटीसारख्या भाषा मॉडेलपर्यंत, एआयने अत्यंत दमदार प्रवास केला आहे. ज्यांना कुशलतेने ही आयुधे वापरता येतात, त्यांचे काम एआय आता मुकाट करू लागला आहे. मला शिकवू नको, असे म्हणत एआयला आपल्याला हवे ते लिहायला किंवा चित्र तयार करायला सांगायचे, ही सध्या बहुतेकांची पद्धत. अशांचे एआय ऐकतेही. फक्त आपल्याला कुवत हवी की, एआयने जे काही आपल्यापुढे वाढले आहे, त्याची व्यवस्थित रचना करता आली पाहिजे. शास्त्रीय कुतूहलाच्या रूपात जे सुरू झाले होते, ते आता अर्थव्यवस्था, उद्योग आणि सरकार चालविणारे इंजिन बनताना दिसत आहे. आजच्या काळात अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होतोय. आणि तो वाढत चालला आहे. सॉफ्टवेअर उद्योगातील जाणकार आता सांगू लागले आहेत की, एआय कोड लिहीत आहे, प्रोग्राम डीबग करू लागला आहे आणि अगदी ॲप्स डिझाइन करायला शिकला आहे. त्यामुळे प्रोग्रामरच्या मोठ्या टीमची गरज कमी होते आहे. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात एआय स्कॅनचे विश्लेषण करीत आहे, रोगांचा अंदाज लावत आहे आणि औषध शोधण्यात मदत करत आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये एआयचे निदान देखील मानवी डॉक्टरांपेक्षा जलद आणि अधिक अचूक असते असे म्हणतात. आर्थिक क्षेत्रात फसवणूक शोधण्यापासून ते शेअर बाजारातील अंदाजांपर्यंत, एआयने आर्थिक व्यवहारांचे आयाम बदललेले आहेत. शिक्षण क्षेत्रात एआय ट्यूटर, वैयक्तिककृत शिक्षण ॲप्स आणि व्हर्च्युअल क्लासरूम मुलांच्या शिकण्याच्या पद्धतीत क्रांती घडवत आहेत. माध्यम आणि कला क्षेत्रात पाहिले तर एआय लेख लिहीत आहे, संगीत तयार करीत आहे, चित्रे तयार करीत आहे आणि चित्रपट देखील तयार करीत आहे. कृषी क्षेत्रात एआय-चालित सेन्सर आणि ड्रोन शेतकऱ्यांना माती, पाणी आणि पीक आरोग्याचे निरीक्षण करण्यास मदत करत आहेत. पर्यावरणवादी हवामानाच्या नमुन्यांचा अंदाज घेण्यासाठी आणि जंगलतोडीचा मागोवा घेण्यासाठी एआयचा वापर करीत आहेत.

एआय कोणत्याही क्षेत्रात येऊ शकतो, असा या साऱ्यांचा अर्थ. परंतु, अद्याप मानवाच्या मेंदूची, मनाची क्षमता एआयला मागे टाकता आलेली नाही. एआयकडे अद्भुत क्षमता असूनही मानवी मेंदूमध्ये असे अनेक गुण आहेत, ज्यांची प्रतिकृती एआय बनवू शकत नाही. ते गुण दाखवू किंवा सादर करू शकत नाही. एआय सहानुभूतीचे अनुकरण करू शकेल. परंतु ती अनुभवू शकत नाही. मानवी प्रेम, दुःख आणि करुणा या बाबी एआयच्या आकलनाबाहेर आहेत. सर्जनशीलतेचेही तसेच आहे. खरी सर्जनशीलता ही जिवंत अनुभव, वेदना, आनंद आणि कल्पनाशक्तीतून येते. एआय विद्यमान डेटा रीमिक्स करू शकेल. परंतु मूळ प्रतिभेशी स्पर्धा करू शकत नाही. मानवी मार्गदर्शनाशिवाय एआय काय बरोबर किंवा काय चूक आहे, हे ठरवू शकत नाही. मानव अनेक गोष्टी न सांगताही समजू शकतो. माणूस व्यंग-विनोद समजू शकतो, उपहास समजू शकतो. गोड बोलूनही एखाद्याला शालजोडीतले हाणू शकतो. याबाबत एआय फार मागे आहे. मानवी मेंदू वाळवंटात, जंगलात किंवा समुद्रातही टिकू शकतो. एआयला मात्र वीज, सर्व्हर आणि अल्गोरिदमशी बांधील राहणे भाग आहे. एआय कोणत्याही मानवी स्वप्नापेक्षा वेगाने माहितीवर प्रक्रिया करते. ते पुनरावृत्तीची, कंटाळवाणी कामे हाताळू शकते. एक एआय सिस्टम एकाच वेळी लाखो लोकांना सेवा देऊ शकते. एआय खर्च कमी करते आणि नफा वाढवते. थोडक्यात मानवाच्या काही मर्यादांवर मात करून एआय अधिकच्या व विस्तारित सेवा प्रदान करू शकते. पण, एक लक्षात घेतले पाहिजे की, एआय मानवी डेटामधून शिकते. माणूसच एआयचा शिक्षक आहे. जर डेटा पक्षपाती असेल तर एआय पक्षपाती बनते. एआय चलित पाळत ठेवली जाऊ लागली तर कुणालाच खाजगी जीवन उरणार नाही. अधिकाधिक समाज एआय-चलित होत गेला तर तो यांत्रिक आणि अमानवी होण्याचा धोका आहे. त्यामुळे आपण त्याच्या आहारी जाता कामा नये. एआयच्या पलीकडे एक आणखी मोठी चर्चा आहे. त्याचे नाव आहे- सुपरइंटेलिजेंस (एसआय). ते प्रत्यक्षात अवतरेल तेव्हा कदाचित मानवाची स्पर्धा अधिक वाढेल. कारण या क्षेत्रातले जाणकार असे म्हणतात की, एआय मानवाच्या नियंत्रणात आहे. एसआय तसे राहीलच याची कोणतीच खात्री देता येत नाही. तरीही एका गोष्टीची खात्री देता येते की, काहीही आले तरी ते मशीनच असेल आणि मशीन हा मानवी मेंदू व मनाला पर्याय असू शकत नाही. प्रतिभेला पर्याय नाही. 'मोहे पनघट पे नंदलाल छेड गयो रे' किंवा 'मेरा जीवन कोरा कागज' किंवा 'क्षण एक पुरे प्रेमाचा'सारखी कविता एआयला करता येत नाही. आपण विविध प्रकारच्या मशीन्स वापरतो. तसे एआय आणि एसआयला वापरायला शिकावे लागेल. ती मानवाची स्वतःची निर्मिती आहे. त्याला घाबरणे मूर्खपणाचे आहे आणि त्याच्यासोबत वाहून जाणेही चूक आहे. मानवी मेंदू हे त्यातील भावना, संवेदना, कविता, तत्त्वज्ञान, प्रेम आणि हास्यासह पृथ्वीवरील सर्वांत असाधारण यंत्र आहे. आपल्यासमोरचे आव्हान एआय आणि मानव यांच्यापैकी एकाची निवड करणे हे नाही. आपल्याला असे जग घडवावे लागेल, जिथे एआय मानवाचे काम सोपे करेल. असे जग घडवावे लागेल, जिथे तंत्रज्ञान करुणा व सेवाभावाने काम करेल. अशा जगाची कल्पना करावी लागेल, ज्यात एआय मानवाच्या सोबत नव्हे तर आज्ञेत आहे आणि ते फक्त मानव कल्याणासाठी कार्यरत आहे. मानवाचे नुकसान करण्यासाठी नव्हे!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दोन लोकशाहींची टक्कर!

एकविसाव्या शतकातील सर्वांत मोठी युती! ॲशले टेलिस या एका अमेरिकन पत्रकाराने भारत-अमेरिका संदर्भात लिहिलेल्या पुस्तकात हे विश्लेषण केले होते.

जागतिक बदलत्या घटनाक्रमात मात्र या दोन लोकशाहीवादी देशांमध्ये कमालीची तेढ निर्माण झाली आहे आणि ती कमी होण्याची चिन्हे नाहीत. भारत-अमेरिका यांच्यातील संबंध अचानक का बिघडले? हे संबंध बिघडण्यासाठी भारत रशियाकडून आयात करीत असलेले कच्चे तेल हे कारण सांगितले जात असले तरी ते पूर्ण खरे नाही. खरी कारणे वेगळीच आहेत.

**समानता :** भारत-अमेरिका या दोन देशांमधील सर्वांत महत्त्वाची समानता म्हणजे लोकशाही मूल्यांवर दोन्ही देशांची असलेली निष्ठा. व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, वृत्तपत्र स्वातंत्र्य, मुक्त अर्थव्यवस्था आणि लोकशाही या पंचसूत्रीशी दोन्ही देशांची बांधिलकी आहे. मात्र तरीही दोन्ही देशांचे संबंध फार सलोख्याचे राहिले नव्हते. आणि याचे मुख्य कारण होते अमेरिकेचा कट्टर शत्रू सोवियत युनियन म्हणजे रशियाशी असलेले भारताचे घनिष्ठ संबंध. आज भारत रशियाकडून केवळ कच्चे तेल आयात करीत आहे. एक काळ होता, भारताने रशियाकडून मिग-२१, मिग-२७, मिग-२९ व सुखाई-३० ही लढाऊ विमाने आयात केली होती. लष्करासाठी लागणारी आयएल-७६ ही मालवाहू विमाने, हेलिकॉप्टर, विमानवाहू नौका या साऱ्या बाबी भारत रशियाकडून आयात करीत होता. तरीही भारत-अमेरिका संबंधात एवढी कटुता कधी आली नव्हती, जी आज आली आहे.

**पहिला धक्का :** भारत-अमेरिका संबंधाला पहिला धक्का लागला तो १९९८ च्या मे महिन्यात भारताने पोखरण अणुचाचणी केल्यानंतर. अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लावले. तेव्हा नुकत्याच सत्तेवर आलेल्या वाजपेयी सरकारची ही एक कसोटी होती. भारत-अमेरिका संबंधात सुधारणा आणण्यासाठी वाजपेयींनी आपल्या विश्वासातील जसवंतसिंग यांच्यावर ही जबाबदारी सोपविली तर राष्ट्रपती क्लिंटन यांनी आपले एक कनिष्ठ अधिकारी स्ट्रोब टॉलबॉट यांच्याकडे हे काम सोपविले. आणि मग या दोघांनी जून १९९८ ते सप्टेंबर २००० या काळात अनेक बैठकी केल्या. त्यातील बहुतेक गोपनीय होत्या. नंतर यावर प्रकाश टाकणारे एक पुस्तक टॉलबॉट यांनी लिहिले. त्याचे शिर्षक होते, 'एगेंजिंग इंडिया - डिप्लोमसी, डेमोक्रसी ॲण्ड द बॉम्ब'. या पुस्तकाचे पहिले प्रकरण आहे- 'द लॉस्ट हाफ सेंचुरी!' म्हणजे भारत-अमेरिका यांनी मैत्री करण्यात अर्धा शताब्दीचा वेळ कसा वाया घालविला याचे विश्लेषण त्यात करण्यात आले आहे.

**मैत्रीचा पाया :** जसवंतसिंग आणि टॉलबॉट यांनी भारत-अमेरिका मैत्रीचा पाया घातला आणि तत्कालीन पंतप्रधान वाजपेयी व राष्ट्रपती क्लिंटन यांनी त्यावर जणू कळस चढविला. अमेरिकेने भारतावर घातलेले आर्थिक निर्बंध मागे घेतले आणि भारत-अमेरिका मैत्रीचा नवा अध्याय सुरू झाला. याच मालिकेत डॉ. मनमोहनसिंग यांनी भारत-अमेरिका अणु ऊर्जा सहकार्य करार केला. भारत-अमेरिका संबंधाचे नवे युग सुरू झाले. या युगाचा रौप्य महोसत्व सुरू होण्याऐवजी अचानक भारत-अमेरिका संबंधात रशियाच्या तेलाचे निमित्त करून दोन्ही देशांत कटुता आली आणि ती अधिक वाढण्याची स्थिती तयार होत आहे. चीनमध्ये नुकतीच शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनची बैठक झाली. या बैठकीत चीनने भारताशी संबंध सुरळीत करण्याची इच्छा केली. पण, हाच चीन भारताचा खरा शत्रू राहिला आहे.

**घोरी, अब्दाली, शाहीन :** पाकिस्तान आज आपल्याजवळ घोरी, अब्दाली, शाहीन ही प्रक्षेपणास्त्रे असल्याच्या वल्गना करीत असला तरी ही प्रक्षेपणास्त्रे त्याने स्वतः विकसित केलेली नाहीत. हे सारे चीन आयात प्रकरण आहे. चीनने १९९० मध्ये त्याला एम-११ नावाचे प्रक्षेपणास्त्र दिले. त्याचे नामकरण पाकिस्तानने 'घोरी' केले. घोरी म्हणजे भारतावर अनेकदा आक्रमण करणारा मोहम्मद घोरी. १९९८ मध्ये उत्तर कोरियाने पाकिस्तानला नो डाँग प्रेक्षपणास्त्र दिले. त्याचे नामकरण त्याने अब्दाली, शाहीन असे केले.

**ऑपरेशन सिंदूर :** चीनने कळस केला तो ऑपरेशन सिंदूर दरम्यान. आपली सर्व अद्ययावत प्रक्षेपणास्त्रे त्याने पाकिस्तानला उपलब्ध करून दिली. भारतीय लष्कराच्या हालचालींची एकदम ताजी माहिती चीन पाकिस्तानला उपलब्ध करून देत होता आणि ही सारी माहिती भारताच्या उपलष्करप्रमुखांनी सांगितली आहे. त्याचाच वापर करून पाकिस्तानने भारताची काही लढाऊ विमाने पाडल्याचे म्हटले जाते. यात पाकिस्तानचे कर्तृत्व कमी आणि चीनचा कारनामा जादा होता. आज पाकिस्तानजवळ जी शस्त्रास्त्रे आहे त्यातील ८१ टक्के चीनने पुरविलेली आहेत. ही माहिती उपलष्कर प्रमुखांनी सांगितली आहे आणि आज हा चीन भारताशी मैत्री करण्याच्या थापा मारीत आहे.

**पाकची नवी कमांड :** केवळ तीन आठवड्यांपूर्वी पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी १४ ऑगस्ट या आपल्या स्वातंत्र्यदिनी पाकिस्तान लष्करासाठी 'रॉकेट कमांड' नावाचे नवे दळ गठित करण्याची घोषणा केली. पाकिस्तानने हे का केले? चीनच्या सांगण्यावरून केले. चिनी लष्करात रॉकेट कमांड नावाचे एक वेगळे दळ असून सारी प्रक्षेपणास्त्रे या दळाच्या अधीन करण्यात आली आहेत. पाकिस्तानच्या रॉकेट कमांडचे पितृत्व चीनकडे आहे. पाकिस्तानी लष्कर असो का पाकिस्तानी अर्थव्यवस्था चीनने लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक या देशात केली आहे. भारत-रशिया संबंध चांगले असले तरी चीनवर मात्र विश्वास ठेवता येणार नाही. १९६२ च्या चीन आक्रमणापासून तो २०२० च्या गलवान खोऱ्यातील रक्तरंजित संघर्षापर्यंत चीनने भारताच्या पाठीत खंजीरच खुपसला आहे आणि भारताला याची पूर्ण जाणीव आहे. शांघाय परिषदेची बैठक या देशात झाली. स्वाभाविकच पंतप्रधान त्यासाठी गेले. यात काहीही चूक नाही. पण, सतत पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या चीनवर विश्वास कसा ठेवता येईल? भारताच्या पोखरण अणुचाचणीनंतर दोन्ही देशांतील संबंध कमालीचे दुरावले होते. पण, क्लिंटन-वाजपेयी यांनी ते केवळ पूर्ववतच केले नाहीत तर त्याला नवी दिशा दिली, नवी गती दिली. आज त्या संबंधात काहीसा गतिरोध झाला असला तरी दोन्ही देशांनी पुन्हा या संबंधाला पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करावा असे आंतरराष्ट्रीय समीक्षकांना वाटत आहे.

**जिनपिंग-मुनीर भेट :** ३ सप्टेंबर रोजी चीनने आपल्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन केले. यात पाकिस्तान, इराण, उत्तर कोरिया यासारख्या देशांना निमंत्रित करण्यात आले होते. सर्वांत डोळे वेधून घेणारी उपस्थिती होती पाकिस्तानचे फिल्ड मार्शल मुनीर यांची. एक दिवस अगोदर राष्ट्रपती शी जिनपिंग व मुनीर यांच्यात गोपनीय चर्चाही झाली. शी जिनपिंग हे केवळ राष्ट्रपती नाहीत तर चिनी सुरक्षा दळांचे सर्वोच्च सेनापतीही आहेत. या दोघांच्या गाठीभेटीचा अर्थ काय काढावयाचा?

**एक नेमकी प्रतिक्रिया :** चीनमध्ये चीन, रशिया व भारत यांच्या नेत्यांच्या बैठकीवर अमेरिका नाराज असली तरी हा भारताचा अधिकार आहे हे अमेरिकेने मान्य केले पाहिजे. ज्याप्रमाणे आण्विक चाचणी करणे हा भारताचा अधिकार होता, त्याचप्रमाणे कोणत्या देशाकडून काय खरेदी करावयाचे हा भारताचा अधिकार आहे हे अमेरिकेने मान्य केले पाहिजे. शेवटी त्यांना एकत्र यावे लागेल अशी एक प्रतिक्रिया त्या देशात उमटू लागली आहे. या भूमिकेचे स्वागतच केले पाहिजे.

# अन्नपूर्णा देवी सुशिलामाता



सद्‌गुरु सुशीलामाता आपल्यात नाहीत हे लिहित असताना अंतकरण खूप जड होत असून बोटांनांही कंप सुटतो आहे. परंतु काही गोष्टी अशा की ज्या परमेश्वराच्या हातातदेखील नसतात. पुण्यात्मा विभुतींची एक ओळख म्हणजे त्यांना जेंव्हा देवाज्ञा होते, तेंव्हा त्यांना कोणत्याही प्रकारच्या खूप मोठ्या शारिरीक त्रासाला सामोरे जावे लागत नाही. अगदी तसेच बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास सद्‌गुरु सुशीलामाता यांना देवाज्ञा झाली. जेव्हा ही बातमी वाऱ्यासारखी पसरली तेंव्हा प्रत्येक भक्त, शिष्याची पावले मठाकडे वळू लागली. रात्रीच्या वेळी मठात तुडुंब गर्दी झाली आणि कुटुंबातील सदस्यांसह प्रत्येक शिष्य, भक्तांना अश्रू अनावर झाले. पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, सांगलीसह सोलापूरच्या पंचक्रोशीतील लोकांनी सद्‌गुरु सुशीलामातांच्या अंतिम दर्शनासाठी गर्दी केली. विशेष म्हणजे एकीकडे गणेश विसर्जन सुरु असताना बाळे येथील स्मशानभूमीत सद्‌गुरु सुशीलामाता पंचतत्वात विलिन झाल्या. सद्‌गुरु सुशीलामातांच्या अंतिम दर्शनासह अंत्यविधीसाठी जमलेल्या हजारोजणांमध्ये चर्चा एकच होती ती म्हणजे अन्नपूर्णा देवी आज आपल्याला सोडून गेल्या.

सद्‌गुरु सुशीलामातांना अन्नपूर्णा देवी म्हणण्यात काहीही वावगे नाही कारण सद्‌गुरु आण्णा महाजरा आणि सद्‌गुरु सुशीलामाता यांच्या सरस्वती चौक अथवा शिवाजीनगर येथील निवासस्थानी असो की बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात असो कोणीही कधीही गेला तरी त्याला सुशीलामातांनी हाताला धरून बसवत चारघास खाऊ घातले नाही, असे कधीच घडलेले नाही. मनुष्यप्राणी हा एक असा आहे की तो भले इतर कोणत्याही गोष्टी कालांतराने विसरेल पण आपल्या पोटात गेलेल्या अन्नाच्या जाणीव मात्र तो नेहमीच ठेवतो. सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सद्‌गुरु सुशीलामात या माऊलींनी शिष्य, भक्तांवर नेहमीच आपल्या मुलांप्रमाणे प्रेम केल्यामुळे श्रीकृष्णाश्रम हे नेहमीच भक्तांनी फुललेले आपल्याला दिसून येते. कर्नाटकात जन्मलेल्या सद्‌गुरु आण्णा महाराज पवार यांनी आपल्या मारुतीरायाच्या साधनेवर महाराष्ट्र, कर्नाटकातील अनेक शिष्य, भक्त, साधकांना नामस्मरणाची शक्ती दिली. आपल्या शिष्यांना दिक्षा देवून नामस्मरणाच्या शक्तीने सर्वांना पावन करण्याचे पुण्यकर्म सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सद्‌गुरु सुशीलामाता यांनी निरंतर केले. बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात सद्‌गुरु आण्णा महाराज यांची समाधी आहे. श्रीकृष्णाश्रम मठात हनुमान जयंती, गुरुपोर्णिमा हे उत्सव मोठ्या भक्तीभावाने आणि हजारो भक्त व शिष्यांच्या उपस्थितीत दरवर्षी साजरे केले जातात. सद्‌गुरु आण्णा महाराजांना सदैव खंबीरपणे साथ देणाऱ्या सद्‌गुरु सुशीलामाता यांनी महाराजांच्या जाण्यानंतर शिष्य व भक्तांवर निस्सिम प्रेमभावना ठेवली. सद्‌गुरु सुशीलामातांनी कधीही कोणालाही भोजन खाऊ घातल्याशिवाय जावू दिले नाही. त्यामुळे प्रत्येकजण गहिवरला आणि त्याच्या तोंडून एकच वाक्य निघत होते की, आई तूम्ही आम्हाला पोरकं केले. सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सुशीलामाता यांच्या पोटी जन्मलेल्या चार मुली आणि तीन मुलांसह जावई, सुना, नातवंडे यांनीदेखील कायमच आण्णा-आईंच्या चरणी लीन होत मठाच्या प्रत्येक धार्मिक कार्यात तन-मनाने सहभाग घेतला. मुंबई, पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील भक्तांची कायमच मठात रिघ लागलेली. प्रत्येकाच्या तोंडात एकच वाक्य ते म्हणजे आज सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सुशीलामातांनी दिलेल्या नामस्मरणाच्या शक्तीवर आमचे जीवन सुखकर झाले. सुशीलामातांच्या जाण्याने पोरकं झाल्यासारखे वाटणाऱ्या प्रत्येकाने हळहळ व्यक्त केली की अशी माऊली पुन्हा होणे नाही. सद्‌गुरु सुशीलामाता यांना परमेश्वराने जरी आपल्या कवेत घेतले असले तरी सुशीलामात आपल्या मुलांना कायमच कवेत ठेवून आपल्यावर प्रेमाचा वर्षाव सदैव करतील यात शंका नाही. सद्‌गुरु आण्णा-आईच्या आशिर्वादासाठी प्रत्येक शिष्य व भक्तांची पावले नेहमीच श्रीकृष्णाश्रमाकडे वळतील आणि धन्य होतील. सद्‌गुरु सुशीलामातांच्या चरणी सांष्टांग प्रणाम...

**- प्रशांत माने, मुख्य संपादक,**
**दै. तरुण भारत, सोलापूर.**
**मो. ९८८११९१४४३**

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# पूर्वजांच्या स्मरणाचा पितृपंधरवडा

भाद्रपद महिन्याच्या पौर्णिमेपासून तर आश्विन महिन्याच्या अमावास्येपर्यंत असणाऱ्या या पंधरा दिवसांना पितृपंधरवडा असे म्हणतात. हे पंधरा दिवस पितरांच्या स्मरणाचे पंधरा दिवस आहेत. या दिवसांमध्ये आपले पितर म्हणजे पूर्वज पृथ्वीकडे सूक्ष्म रूपाने येतात व त्यांना आपण त्याचे स्मरण करीत आहोत, त्यांचे श्राद्ध करीत आहोत हे पाहून दान, पिंडदान करीत आहेत हे पाहून आपण दिलेला भाग ग्रहण करून समाधानाने ते परत जातात अशी मान्यता आहे. वास्तविक पाहता आपले पृथ्वीवरील अस्तित्व हे आपल्या आजोबा, पणजोबा आणि त्यांच्याही आधीच्या पितरांमुळेच आहे. त्यामुळे वर्षातून एक वेळा त्यांचेही स्मरण करणे ज्यांच्या आधारावर आपण आहोत हे आपले कर्तव्यच आहे. पितरांपासून आम्हाला या पृथ्वीवर केवळ जन्मच मिळालेला नाही तर त्यांच्याद्वारे आम्हाला सुख, संपत्ती व अनेक गोष्टींची प्राप्ती झालेली असते. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. अशी पण मान्यता आहे की ज्यांचे पितर कुठल्या ना कुठल्या गोष्टीमुळे असमाधानी असतात त्या परिवाराला अडचणी, अनारोग्य, अपयश इत्यादी गोष्टींना सामोरे जावे लागते. आपल्या घरातसुद्धा आपले आई, वडील जर नाराज असतील तर त्यांच्या नाराजीचा परिणाम संपूर्ण घरावर झालेला आपल्याला दिसतो. तशाच पद्धतीची ही सुद्धा मान्यता आहे.

काही नास्तिक लोक हे पृथ्वीवर पितरांना पिंडदान केल्याने त्यांना ते मिळते का, ते खरंच खातात का, त्यांना खायला दात आहेत का, अशा पद्धतीचे प्रश्न विचारतात. त्यांच्या बुद्धीप्रमाणे त्यांनी विचारलेले हे प्रश्न योग्यच म्हणायला हवेत कारण त्यांचा विकास हा आपल्या पूर्वजांनी सांगितलेल्या स्तरापर्यंत झालेला नाही हेच यावरून आपल्या लक्षात येते. आपण देवाला नैवेद्य दाखवताना सुद्धा देव काही तुम्ही त्याच्यासमोर वाढलेला वरण-भात खात नाही पण तरीसुद्धा आपण देवाला नैवेद्य दाखवतो. आपण गाईला सुद्धा पोळी देतो, आपण पक्ष्यांसाठी, मुंग्यांसाठी सुद्धा काहीतरी काढून ठेवतो. यावरून आपण लक्षात घेतले पाहिजे की आपण जे अन्न ग्रहण करणार आहोत त्या अन्नावर ज्या गांडुळाने माती भुसभुशीत केली त्याचा, ज्या मित्र कीटकांनी पिकावरच्या शत्रू कीटकांना मारले किंवा रोखले त्यांचा, जे पक्षी संपूर्ण शेत उद्ध्वस्त करू शकत होते परंतु त्यांनी ते केले नाही त्यांचा आणि ज्यांनी ते शेत नांगरले, वखरले त्या शेतकऱ्याचा, ज्या श्रमिकांनी तुमच्या घरापर्यंत ते धान्य आणून दिले त्यांचा या सर्वांचा अधिकार असतो असे मानले जाते. असे मानणे हीच खरी संस्कृती आहे. "गरज सरो आणि वैद्य मरो." 'युज ॲण्ड थ्रो' ही तर आधुनिक काळातील पद्धत आहे. समाजामध्ये काही लोक या प्रवृत्तीचे असू शकतात



परंतु ही पद्धती कोणीही परंपरा म्हणून स्वीकार करणार नाही. आणि हजारो वर्षे ती चालणार सुद्धा नाही. प्रभू रामचंद्रांनी सुद्धा त्यांचे वडील दशरथ यांचे श्राद्ध केल्याचा उल्लेख रामायणामध्ये आलेला आहे. त्यामुळे ही परंपरा फार प्राचीन आहे. आपल्याला जर रासायनिक प्रक्रिया समजून घ्यायच्या असतील तर आपल्याला रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेत जावे लागेल व धर्म, संस्कृती, अध्यात्म समजून घ्यायचे असेल तर त्या प्रयोगशाळेत जावे लागेल. त्यातील तज्ज्ञ लोकांच्या सोबत आपल्याला चर्चा करावी लागेल.

मुसलमान, ख्रिश्चन आणि जगातील इतरही धर्म ज्या काही गोष्टींचे पालन करतात त्यांनाही काही खूप मोठे वैज्ञानिक आधारस्तंभ लाभलेले आहेत अशातला भाग नाही, परंतु त्यांच्या भीतीने कोणीही त्यांच्या परंपरांवर आक्षेप घेण्याची हिंमत करत नाही. परंतु हिंदू समाज हा सहिष्णू आहे. त्यामुळे इतर धर्मांतील लोक तर आमच्या परंपरांवर फारसे बोलत नाही कारण त्यांच्या परंपरा कशा आहेत हे त्यांना माहीत आहे. परंतु हिंदू धर्मातीलच आमचे काही नास्तिक धर्मद्रोही लोक असे आहेत की जे विनाकारण समाजामध्ये अश्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. जिवंतपणी तुम्ही आपल्या आई-वडिलांची सेवा केली पाहिजे आणि त्यांना आनंद, समाधान मिळेल अशा पद्धतीने वागले पाहिजे असे सांगितलेले आहे. परंतु त्याचप्रमाणे त्यांनी या लोकाचा त्याग केल्यावरही त्यांचे विस्मरण आपल्याला पडू नये. कारण त्यांनी बांधलेल्या घरात, त्यांनी कमावलेल्या संपत्तीमध्ये, त्यांनी आपल्याला दिलेल्या शेतीवाडीमध्ये आपण राहात आहोत किंवा त्याचा उपभोग घेत आहोत. त्यामुळे जोपर्यंत आपण या सर्व गोष्टींचा उपभोग घेणार आहोत तोपर्यंत आपण त्यांचे कर्जदारच आहोत. त्यांचे ऋण आपण मान्य केले पाहिजे ही मानवीय सभ्यतेची सर्वोच्च अवस्था आहे. जे त्या अवस्थेला पोहोचलेले नाहीत त्यांना कदाचित ते समजणार नाही. इंग्लंडमध्ये सुरू असलेली क्रिकेटची मॅच जर भारतातल्या खेड्यापाड्यांमध्ये दिसू शकते तर तुम्ही अर्पण केलेले पिंड, तुम्ही अर्पण केलेला भात, तुम्ही अर्पण केलेले दान हे सुद्धा तुमच्या पितरांपर्यंत निश्चितपणे पोहोचू शकते. ज्यांच्या घरी केबलचे कनेक्शन नाही त्यांना त्यांच्या घरी क्रिकेटची मॅच दिसणार नाही. त्यामुळे कदाचित ते मान्य करणार नाही. परंतु विज्ञान ज्यांना मान्य आहे त्यांना ग्रह, उपग्रह हे सुद्धा मान्य आहेत आणि इंग्लंडमध्ये चालू असणाऱ्या क्रिकेटच्या मॅचचे अस्तित्व सुद्धा मान्य आहे. तशाच पद्धतीने आपण या गोष्टीला घेतले पाहिजे.

या पंधरा दिवसांमध्ये अल्पायुषी मृत्यू झालेल्या व्यक्तीचे, अविवाहित व्यक्तीचे, गृहस्थाश्रमी व्यक्तीचे, संन्यासी, तपस्वी, ब्रह्मचारी, आई, मातृसमान स्त्रियांचे श्राद्ध, लहान वयात मृत झालेल्या मुलींचे, अविवाहित मुलींचे, युद्धामध्ये वीरगतीला प्राप्त झालेल्या लोकांचे, अपघातामध्ये मृत्यू झालेल्या लोकांचे श्राद्ध असे अनेक प्रकारचे श्राद्ध कोणत्या कोणत्या दिवशी करावे हे सुद्धा सांगितलेले आहे. म्हणजे प्रत्येक दिवसाचा अशा व्यक्तींशी सुद्धा काहीतरी संबंध आहे. यावरून त्याची निश्चिती करण्यात आलेली आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

प्रत्येक गोष्टीमध्ये हजारो वर्षांची परंपरा आहे, विचार आहे. नवीन पिढीने हा विचार समजून घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या धर्मातील तज्ज्ञ लोकांकडून त्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. आपणही लक्षात घेतले पाहिजे की, कुठलाही मुसलमान त्याच्या मुल्ला मौलवींनी सांगितलेल्या गोष्टींवर, पुराणांमध्ये सांगितलेल्या गोष्टींवर, कुराणात, हदीसमध्ये सांगितलेल्या गोष्टीवर आक्षेप घेत नाही. आपल्या धर्मात तर आक्षेप घेण्याची सुद्धा सोय आहे आणि सगळ्यांनी अभ्यास करून तर कधी श्रद्धेने या गोष्टी स्वीकाराव्या आणि त्याचे पालन करावे असे सांगितलेले आहे.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये जे मारले गेले, ज्यांना इंग्रजांनी फासावर लटकवले, त्यांच्यापासून तर विविध युद्धांमध्ये मारल्या गेलेल्या सैनिकांपर्यंत, ज्यांनी ज्यांनी आमच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान केलेले आहे अशा शूरवीर सैनिक आणि क्रांतिकारकांसाठी सुद्धा श्राद्ध केले पाहिजे. श्राद्ध म्हणजे श्रद्धेने केलेले कर्म. श्रद्धापूर्वक केलेल्या कर्मानेच आपले पूर्वज प्रसन्न होतात. त्यांना प्रसन्न करण्याच्या या दिवसांमध्ये आपणही समाजाचे, देशाचे आणि आपल्या पूर्वजांचे ऋण स्मरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## कृत्रिम हौदात श्रींचे विसर्जन

पुणे शहरातील गणेशोत्सवाला सामाजिक इतिहास आहे. पुणे शहराच्या गणेशोत्सवाच्या इतिहासात मानाचे पाच गणपती - कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या पाच मानाच्या गणपती मंडळांनी नेहमीच सामाजिक भान राखले आहे. यावर्षी या पाच मानाच्या गणपती मंडळांनी आपल्या मानाच्या गणपतींचे कृत्रिम हौदात विसर्जन केले. या पाच मानाच्या गणपतींबरोबरच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ व अखिल मंडई गणपती मंडळ यांनीही आपल्या गणपतींचे विसर्जन कृत्रिम हौदात केले आहे. नदी व जलप्रदूषण होऊ नये या सामाजिक जाणिवेतून या मंडळांनी घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. हा निर्णय घेऊन या मंडळांनी आपली सामाजिक जाणीव दाखवून दिली आहे. त्यांचा हा निर्णय अनुकरणीय आहे. या मंडळांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढील वर्षी आणखी काही मंडळे आपल्या गणपतींचे विसर्जन कृत्रिम हौदात करतील यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## परिवहन मंडळाची लालपरी झाली खिळखिळी

परिवहन मंडळाच्या जुन्या एसटी बसेसमध्ये प्रवासा दरम्यान बिघाड होत आहे. अनेक बसेसचे पत्रे तुटले असून अपघातग्रस्त बसेस रस्त्यावर धावताना दिसत आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची जीवनवाहिनी ठरलेली लालपरी आज खिळखिळ्या अवस्थेत प्रवाशांच्या सेवेत धावत आहे. एकेकाळी वेळेचे भान ठेवणारी आणि प्रवाशांचा विश्वास संपादन करणारी एसटी आता तुटलेले पत्रे, धावती बस तांत्रिक अडचणीमुळे बंद पडणे, धावती चाके निघून जाणे, फाटलेली आसने, धुराचे लोट व थरथरणारे इंजिन घेऊन रस्त्यावरून कसाबसा प्रवास करताना दिसत आहे. जवळपास सर्व आगारांतील २५ हून अधिक एसटींची अवस्था दयनीय आहे. पुढील महिन्यात १० बसेस भंगारात निघतील, असे आगार व्यवस्थापनाकडून दबक्या आवाजात सांगण्यात येते. बऱ्याच आगारात पूर्वी १०० एसटी बसेस कार्यरत होत्या. मात्र सध्या केवळ ७५ ते ८० बसेस सेवेत आहेत. त्यापैकी २५ हून अधिक बसेसची कालमर्यादा संपत आली आहे. त्यामुळे या बसेस वारंवार नादुरुस्त होत असतात. उर्वरित बसेस रस्त्यावर धावत असल्यातरी प्रवाशांच्या तुलनेत त्यांची संख्या खूपच कमी आहे. परिणामी लांब पल्ल्याच्या फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय आगार व्यवस्थापनाला घ्यावा लागला आहे. यामध्ये नाशिक, संभाजीनगर, पुण्याच्या गाड्या बंद करण्यात आल्या आहेत. तर पुणे व मुंबईला धावणाऱ्या एसटीच्या फेऱ्या कमी करण्यात आल्या आहेत. बसेसची संख्या कमी झालीच. शिवाय चालक व वाहकांची संख्याही पुरेशी नाही. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार, मोठ्या प्रमाणात महिला वर्ग आजही एसटीवर अवलंबून आहेत. पण त्यांच्या प्रवासाचा अनुभव मात्र त्रासदायक ठरत आहे. फाटलेली आसने, एसटीतील धडधड -खडखड आणि रस्त्यात मध्येच बंद पडणारी एसटी असा त्रासदायक अनुभव प्रवासी घेत आहेत.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

## वाचक पत्रे

## भारताचा अश्वमेध रोखणे अशक्य

'भारत आणि रशियाला आम्ही गमावले : ट्रम्प' ही बातमी वाचली. भारताला अजूनही वसाहतींचा समूह समजणाऱ्या पाश्चात्त्य देशांचा गैरसमज देशात काँग्रेस सरकार अस्तित्वात असेपर्यंत कायम होता. काँग्रेस सरकार असताना काँग्रेसने भारतीय लोकसंख्येला एक मजबुरी (लायबिलिटी) समजून सातत्याने पाश्चात्त्य देशांसमोर लोटांगण घातले आणि विदेशी कर्ज मिळवून चैन केली. त्याच भारतीय लोकसंख्येला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भांडवल समजून, त्यांच्या कौशल्याला, क्षमतेला आणि मेहनतीला जागतिक पातळीवर ओळख मिळवून दिली. आत्मनिर्भर भारत याच लोकसंख्येच्या जीवावर काय चमत्कार करू शकतो हे मोदींनी जगाला दाखवून दिले. भारत स्वावलंबी होणे हा मोठा आर्थिक धोका समजणाऱ्या काँग्रेस आणि अमेरिकेला हे कसे सहन होणार? म्हणून भारतीय अर्थव्यवस्था मृत झाल्याची आवई अमेरिकेने उठवली आणि लगेच काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांचीच री ओढून आपला भारतविरोध दाखवून दिला. भारतावर अन्यायकारक ५० टक्के टॅरिफ लावून भारतावर दबाव निर्माण केला. पण भारताने हा दबाव झुगारून लावला. अमेरिकेसमोर शरणागती पत्करायला नकार देत भारताने रशिया आणि चीनसह एससीओ देशांशी सहकार्य करण्याचे धोरण राबवले. भारतीय अर्थव्यवस्थेने गेल्या तिमाहीत विक्रमी ७.८ टक्के जीडीपी नोंदवून जगाला आरसा दाखवला. पुढे तर लगेच जीएसटीमध्ये प्रचंड सवलती देऊन मजबूत भारतीय अर्थव्यवस्थेचा सबळ पुरावाही दिला. हे सगळे बघून हबकलेल्या ट्रम्प यांनाही आपल्या धोरणांचा पुनर्विचार करावा लागला. आता लवकरच ते टॅरिफ मागे घेण्याचीही शक्यता आहे. मात्र यामुळे सातत्याने मोदीविरोध आणि देशविरोध करणाऱ्या काँग्रेसची पुरती गोची झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावाखाली आत्मनिर्भर भारताचा हा विजयी रथ कोणीही रोखू शकत नाही, हे वास्तव आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सार्वजनिक शांततेस बाधा आणणारा कोणीही असला तरी गुन्हा दाखल करण्यात येईल-पोलिस अधीक्षक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी प्रशासना बरोबरच जिल्ह्यातील नागरीकांची सुद्धा आहे.

परंतू असे निदर्शनास आले आहे की, जिल्ह्यातील काही नागरिकांकडून ठराविक समाजाला लक्ष करुन त्यांचेवर आक्षेपार्ह विधाने करून, सोशल मिडीयावर आक्षेपार्ह मजकूर/पोस्ट प्रसारित करुन, बॅनर्स फाडून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



बीड जिल्ह्यातील नागरीकांना बीड पोलीसांकडून असे आवाहन करण्यात येते की, सर्वांनी बीड जिल्ह्याचे वातावरण सौहार्दपूर्ण व शांततापूर्ण ठेवावे. कोणाच्याही आक्षेपार्ह विधानांना, सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्टला तात्काळ, कोणताही विचार न करता प्रतिसाद देऊ नये. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे.

जिल्ह्यातील शांतता भंग करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करणारा, सार्वजनिक शांततेस बाधा आणणारा कोणीही असला तरी त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल.असे पोलीस अधीक्षक श्री.नवनीत कॉंवत यांनी स्पष्ट केले आहे.

# बीड ते परळी रेल्वेमार्ग भूसंपादणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यात लवकरच रेल्वे सुरु होणार असून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. परंतू बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाबाबतचे अडथळे सर्व संबंधीत विभागानी दूर करून, भूसंपादन कामाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहा.कार्यकारी अभियंता मुकुंद पुं. नाईक, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी श्री. अरविंद लाटकर, श्रीमती वसीमा शेख, श्री. गौरव इंगोले यांनी बैठकीत सहभाग घेतला.जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वेमार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे सर्व संबंधीत विभागाने समन्वय साधून तातडीने निकाली काढून रेल्वे मार्गासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. राष्ट्रीय राज्यमार्ग विभागाने ब्रम्हवाडी येथील उड्डानपूलाचे काम लवकरात लवकर सुरु करावे. तसेच सर्व संबंधीत उपविभागीय अधिकारी यांनी भूसंपादना बाबतची प्रक्रिया वेळेत पूर्ण करुन अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली बीड रेल्वे स्थानकाची पाहणी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज बीड येथील रेल्वे स्थानकास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करत येथील कामांची माहिती घेतली. यावेळी श्री. जॉन्सन यांनी दि. १७ सप्टेंबर रोजी बीड ते परळी रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाच्या अनुषंगाने संबंधित विभागांस योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच रेल्वे स्थानकातील सर्व सुविधाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी श्री जॉन्सन यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, कार्यकारी अभियंता मध्य रेल्वे अहमदनगरचे लोकेंद्र कुमार सिंग, वरिष्ठ अभियंता एल.पी. नायक, वरिष्ठ अभियंता अमरकुमार अकेला, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांची अभिरुची ओळखून शिक्षक त्यांना घडवत असतो – उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.८ सप्टेंबर**

शिक्षक हा विद्यार्थांची अभिरूची ओळखून त्यांना आकार देण्याचं काम सातत्याने करीत असतो. हे अभिमानास्पद पुण्यकर्म शिक्षकांच्या वाट्याला आल्याचा आनंद आहे.असे शिक्षकांबद्दल चे गौरवोद्गार पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांनी लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिनाच्या निमित्ताने संपन्न झालेल्या शिक्षक गुणगौरव सोहळ्यात काढले.




याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार तर प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक संजय कुलकर्णी शिक्षकांबद्दल कृतज्ञतेची भावना प्रास्ताविकातून व्यक्त केली .*संस्था विकासात माझे योगदान* या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेतील गुणवंत शिक्षकांचा सत्कार करून अन्य सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांनी आपल्या मनोगतातून समाज घडविण्याचे काम , कुटुंबव्यवस्था, जबाबदार नागरिक व पुढील पिढीमध्ये संस्कार निर्माण करण्याचे काम शिक्षक करतो. शिक्षकांच्या छडीतून सुटलेला विद्यार्थी नंतर दुर्दैवाने तो आमच्या छडीत सापडतो .हे शिक्षण क्षेत्रातलं कटू वास्तव मांडलं.अध्यक्षीय समारोपात मधुकरराव वट्टमवार यांनी शिक्षक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण नेमट तर आभार ज्ञानेश मातेकर यांनी मानले. गुणगौरव सोहळ्यात शिक्षक सत्कार वाचन पर्यवेक्षक कृष्णा मारावार माधव मठवाले व अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे यांनी केले .वैयक्तिक गीत मंजुषा रुद्रवार तर रुपाली थोरात यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानोपासक मंडळ प्रमुख आशा गौतम, मीनाक्षी कस्तुरे सह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आखिल भारतीय पेशवा संघटनेकडुन सौ.पुजा कुलकर्णीचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ सप्टेंबर**

योगेश्वरी मंदिर ट्रस्टच्या कोषाध्यक्ष पदी सौ.पुजा कुलकर्णी यांची निवड झाल्यानंतर सर्वत्र आनंद व्यक्त होत असुन आखिल भारतीय पेशवा संघटनेने निवासस्थानी जावुन त्यांचा शाल, श्रीफळ देत सत्कार केला. त्यांच्या निवडीचा आम्हाला खुप आनंद झाल्याची प्रतिक्रिया कार्यकारी अध्यक्ष सुधीर धर्माधिकारी यांनी दिली.



सौ.पुजा कुलकर्णी २०१६ ते १९ दरम्यान योगेश्वरी मंदिर ट्रस्ट संचालक पदावर काम करत होत्या. धर्मादाय आयुक्त बीड यांनी मंदिर ट्रस्टची पुनर्रचना केल्यानंतर परवा नुतन पदाधिकार्यांची निवड करण्यात आली. सचिव पदी गिरीधारीलाल भराडिया, उपाध्यक्ष अक्षय मुंदडा, सहसचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष पदावर सौ.कुलकर्णी यांची सर्वानुमते निवड झाली. निवडीचा आनंद साजरा करताना आखिल भारतीय पेशवा संघटनेच्या प्रमुख पदाधिकार्यांनी निवासस्थानी जावुन त्यांचा सर्हदय सत्कार केला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय देशपांडे, कार्यकारी अध्यक्ष सुधीर धर्माधिकारी, सचिव डॉ.दिलीप कुलकर्णी, कोषाध्यक्ष भास्कर देशपांडे, सदस्य अभय जोशी, प्रसिद्धीप्रमुख सौ.अंजली देशपांडे, शहराध्यक्ष श्रीमती अंजली चौधरी, अॅड.सौ.सुनिता जोशी आदींनी शाल, श्रीफळ देवुन त्यांचा सत्कार केला.

आंबेकर कुटुंबियांकडून सत्कार - जेष्ठ पत्रकार दत्ता आंबेकर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शामल आंबेकर, सौ.उमा देशमुख यांच्यासह खोलेश्वर महाविद्यालयातील लिपीक अभिजित दोखणे आणि पंढरीनाथ जोशी यांनी सौ.पुजा कुलकर्णी यांचा सर्हदय सत्कार केला. आंबेकर हे तीर्थक्षेत्र रेणुका देवीचे पुजारी आहेत. सौ.पुजा कुलकर्णी आमच्या कौटुंबिक सदस्य असुन त्यांच्या निवडीने खुप आनंद झाल्याची प्रतिक्रिया दत्ता आंबेकर यांनी दिली.

# धाकटी पंढरी नारायणगड रस्ता झाला चाळणी भाविक त्रस्त, प्रशासनाकडे संतापाचा सूर

**दरमहा ३ ते ५ लाख भाविकांची पावले; जीव धोक्यात घालून प्रवास, हजारो खड्ड्यांनी भरलेला रस्ता; दुरुस्तीची मागणी तीव्र**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र नगदनारायण संस्थान, नारायणगड हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथे दरवर्षी एकादशीसह अनेक उत्सव साजरे होतात. महाराष्ट्रभरातून भाविक भक्त दर्शनासाठी या स्थानी गर्दी करतात. श्री क्षेत्र पंढरपूरनंतर या ठिकाणाला भक्ती पंढरी अशी ओळख मिळालेली आहे.


मात्र या भक्ती पंढरीकडे जाणारा प्रवास भक्तांसाठी जीवघेणा ठरत आहे. ३ ते ४ किलोमीटर लांबीचा नारायणगड रस्ता अक्षरशः चाळणीसारखा झाला असून रस्त्यावर तब्बल ३ हजार पेक्षा जास्त खड्डे असल्याचे स्थानिकांचा दावा आहे. एका फेरीत प्रवास करताना वाहनधारकाला सरासरी १५० ते २०० वेळा धक्के बसतात.

भाविकांचा दम छाक

सहाजिकच प्रवास करताना भाविकांचा अक्षरशः दम छाक होतो. विशेषतः वृद्ध, महिला आणि लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. दरमहा ३ ते ५ लाख भाविक येथे येतात. यातील बरेच भाविक दुचाकी, जीप व खासगी गाड्यांनी प्रवास करतात. अशा खडतर रस्त्यातून प्रवास करताना अपघातांची शक्यता येथे वाढली आहे. गेल्या सहा महिन्यांत अनेक लहानमोठे अपघात झाल्याचे ग्रामस्थ सांगतात.

संतापाचा सूर वाढतोय

पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविक वारंवार रस्ता दुरुस्तीची मागणी करत आहेत. मात्र प्रशासनाने अद्यापही या रस्त्याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे भाविक भक्तांच्या जीवाशी खेळ चाललाय अशी भावना भक्तांमध्ये व्यक्त होत असून संतापाचा सूर वाढत आहे.



धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व

नारायणगड हे संत नारायण महाराजांचे संजीवन समाधी स्थळ आहे. येथे आलेल्या भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात, अशी श्रद्धा आहे. मंदिर परिसरात अनेक विकासकामे सुरू आहेत, परंतु मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती मात्र अद्याप झालेली नाही.

प्रत्येक एकादशीला ३ ते ५ लाख भाविकांची गर्दी उसळते. यामुळे रस्ता दुरुस्तीची मागणी अधिक तीव्र झाली आहे. भाविकांनी प्रशासनाला रस्त्याचे काम लवकरात लवकर हाती घ्या, अन्यथा मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल असा इशारा दिला आहे.

निसर्गरम्य पण खडतर

नारायणगड उंच डोंगरावर वसलेले असून येथे आल्यानंतर स्वर्गीय आनंद मिळतो. निसर्गाच्या सानिध्यातील हे पवित्र स्थान भाविकांसाठी अद्वितीय आहे. यामुळे इथं निसर्गप्रेमी आणि पर्यावरण प्रेमी पर्यटक यांची संख्या वाढलेली आहे मात्र खडतर व धोकादायक रस्त्यामुळे या आध्यात्मिक आनंदावर पाणी फिरत आहे.

# योगेश्वरी जयहिंद ग्रुप वतीने पहिला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार एस. बी. शिंदे यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ सप्टेंबर**

येथील जय हिंद ग्रुपच्या वतीने पहिला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार योगेश्वरी नूतन विद्यालयाचे मंदिर विभाग प्रमुख श्री सुभाष बाजीराव शिंदे यांना शिक्षक दिनी प्रदान करण्यात आला. जय हिंद ग्रुप ची स्थापना ही समाजातील प्रदूषण मुक्तीसाठी मग ते वैचारिक प्रदूषण सामाजिक प्रदूषण पर्यावरणीय प्रदूषण नष्ट करण्यासाठी करण्यात आलेली आहे. जय हिंद ग्रुप नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असून जय हिंद ग्रुप च्या वतीने वृक्षारोपण जलसंधारण तसेच विविध समाज उपयोगी कार्य केली जाते.

प्रथमतः डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे शिक्षक दिनाच्या औचित्याने पूजन करण्यात आले. योगेश्वरी जयहिंद ग्रुप च्या

वतीने यावर्षीपासून सुरू केलेल्या पहिल्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी श्री एस बी शिंदे (मंदिर विभाग) प्रमुख यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री एस बी शिंदे सर हे शिस्तीचे शिक्षक असून गेल्या ३० वर्षापासून ते मराठीचे अध्यापन करतात. त्यांच्या कामातील नीटनेटकेपणा, अध्यापन, वक्तशीरपणा, विद्यार्थी प्रियता आणि चोख काम तसेच मंदिर विभाग प्रमुख झाल्यापासून उत्तम प्रशासन व त्या परिसरात निसर्ग फुलवण्याचं काम या सर्व गोष्टी लक्षात घेता योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सन्माननीय ज्येष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोमटे, ज्येष्ठ सल्लागार प्रा. गोळेगावकर सर, संस्थेचे संचालक व सहसचिव लंकेशजी वैद्य सर यांच्या हस्ते त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. योगेश्वरी जय हिंद ग्रुपचे अध्यक्ष मेजर प्राध्यापक एस पी कुलकर्णी , सचिव भागवत मसने, कायदेशीर सल्लागार अडवोकेट राजेंद्रप्रसादधायगुडे, सदस्य दत्ता बनसोडे, संतोष चौधरी माजी मुख्याध्यापक एस के निर्मळे आदींची उपस्थिती होती.

# छत्रपती साखर कारखान्याच्या २५ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**छत्रपती साखर कारखाना ६ लाख मेट्रिक टन ऊस गाळप करणार – व्हा. चेअरमन मोहनराव जगताप**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ सप्टेंबर**

छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या २५ व्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा कारखाना परिसरात उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे व्हा.चेअरमन मोहनराव जगताप होते. सुरुवातीस कारखान्याचे कार्यकारी संचालक महेश सगरे यांनी गेल्या आर्थिक वर्षाचा हिशोब, कामकाजाचा आढावा तसेच कारखान्याच्या प्रगतीची माहिती मांडली. यावेळी आगामी हंगामात ६ लाख मेट्रिक टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कारखान्याच्या कामकाजावर समाधान व्यक्त करताना शेतकरी सभासदांनी ऊस उत्पादकांना वेळेत देयक मिळावे, तांत्रिक सोयीसुविधा वाढवाव्यात व कारखान्याच्या विकासासाठी नवे प्रकल्प



हाती घ्यावेत अशा अपेक्षा व्यक्त केल्या. तसेच आर्थिक अहवाल व ठराव सर्वसंमतीने मंजूर करण्यात आले.

यावेळी व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखाना व संचालक मंडळ नेहमीच कटिबद्ध असल्याचे सांगितले. कारखाना आधुनिकतेकडे वाटचाल करत असून ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी आगामी काळात ठोस उपाययोजना राबविल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गेल्या दहा हंगामात छत्रपती कारखान्याने इतर कारखान्यापेक्षा जास्त ऊसाला भाव दिला आहे तीच परंपरा या गाळप हंगामात कायम राहील असे मत व्यक्त करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस छत्रपती कारखान्यास गळपास आणावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाला अनेक नेतेमंडळी कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी सभासद , कारखान्याचे कर्मचारी,ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील अविष्कार स्पर्धेसाठी नोंदणीची तारीख १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ सप्टेंबर**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अविष्कार स्पर्धेसाठी नोंदणीची अंतिम तारीख वाढविण्यात आली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी आता १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करता येणार आहे.या स्पर्धेसाठी आतापर्यंत ६४ महाविद्यालयांतील १६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. बीड जिल्ह्यात एकूण १२० महाविद्यालये कार्यरत असून अजूनही अनेक विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी आहे.गणेश विसर्जन, ईदची सुट्टी आणि त्यास जोडून आलेला रविवार लक्षात घेता विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी अधिक वेळ मिळावा, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अविष्कार समन्वयक डॉ. भास्कर साठे यांनी नोंदणीची तारीख दिनांक १५ सप्टेंबर पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.अविष्कार स्पर्धा दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड येथे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुहास मोराळे यांनी केले आहे.नोंदणीसंबंधी काही अडचणी आल्यास बीड जिल्हा समन्वयक डॉ. स्वाती कुलकर्णी (मो. ९४२२३२६९८८) किंवा डॉ. अशोक डोंगरे (मो. ९४२३७१६९४१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बीड शहरात गणेश मंडळांच्या माध्यमातून कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती मोहीम राबविली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ सप्टेंबर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील विविध गणेश मंडळांना भेट देत डेंगू, चिकनगुनिया आणि हिवताप यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे, जिल्हा पर्यवेक्षक श्री. संजय धस आणि बीड शहरातील आरोग्य सहाय्यक व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम राबविण्यात आली.

प्रत्येक गणेश मंडळामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व सदस्यांना कीटकजन्य आजारांची माहिती देण्यात आली. यावेळी लोकांना ऑडिओ क्लिप, व्हिडिओ क्लिप आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून डास नियंत्रणाचे उपाय समजावून सांगण्यात आले. विशेषतः गप्पी मासा आणि लारवा यांच्या कार्यावर भर देण्यात आला.



गप्पी मासा हा डासांची अंडी खाणारा डासभक्षक मासा असून तो पाण्यामध्ये डासांची पैदास थांबवण्यास मदत करतो. यामुळे प्रत्येक घरामध्ये गप्पी मासा पाळावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच, घरातील पाणी साठवणाऱ्या भांड्यांची नियमित स्वच्छता, परिसरातील स्वच्छता, वापरात नसलेल्या टायर, नारळीकरवंटी, प्लास्टिकच्या बाटल्या, भंगार यांची योग्य विल्हेवाट आणि साचलेल्या पाण्याची निचरा करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा, डेंगू चिकनगुनिया पळवा आणि गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा अशा संदेशांच्या माध्यमातून लोकांपर्यंत प्रभावी आरोग्य शिक्षण पोहोचविण्यात आले.

या मोहिमेत श्री. पठाण शगीर यांनी नागरिकांना त्यांच्या भाषेत कीटकजन्य आजारांबाबत माहिती दिली. सर्व गणेश मंडळांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, लोकांनीही स्वच्छतेच्या या उपक्रमात सहभाग नोंदवला.

आरोग्य विभागाच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सवाच्या काळात डेंगू, हिवताप व चिकनगुनियावर नियंत्रण मिळवण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रातून १ हजार रोजगार उपलब्ध होणार

## केंद्राचे अध्यक्ष तथा आ. हेमंत पाटील यांची माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्रातून किमान १ हजार तरूणांना रोजगार उपलब्ध होणार असल्याची माहीती केंद्राचे अध्यक्ष तथा आ. हेमंत पाटील यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

वसमत येथील हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून वसमत येथे दि ८ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्व साधारण सभा तसेच जिल्हास्तरीय हळद उत्पादक शेतकरी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी केंद्राचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे आ. हेमंत पाटील, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र कदम, मार्गदर्शक, डॉ विजय काळे, डॉ अनिल ओळंबे यांच्यासह लक्ष्मीनारायण मुरक्या, संभाजी सिध्देवार, सदाशिव पुंड, शिवाजी काकडे, रितेश जुजाराव, श्रीमती सुनंदा पौळ, मन्मथ सिध्देवार, प्रतिक्षा पतंगे आदींची उपस्थिती होती.

यावेळी हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना सांगितले की, मी खासदार असतांना याठिकाणी हळद संशोधन केंद्र व्ह- वे यासाठी शासनाकडे सतत पाठपुरावा केला आहे. या भागातील हळदीचे उत्पादन, हळद उत्पादक शेतकऱ्यांची संख्या, हळद लागवडीचे क्षेत्र या सर्वबाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. याठिकाणी संशोधन केंद्राची का आवश्यकता आहे हे दाखवून दिल्यामुळेच केंद्र मंजुर झाले. वसमत येथील हळद संशोधन केंद्र ओल्या हळदीपा- सून प्रक्रिया होणारा हा पहिलाच प्रकल्प आहे. या केंद्रात ७० ते ८० अधिकारी व संशोधक काम करणार आहेत. यातून संशोधन करून नवीन वाण विकसित करण्यावर भर असणर आहे. याशिवाय १ हजार तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वसमत शहर हे एक प्रकारे आर्थिक केंद्र होणार असल्याचे यावेळी आ. पाटील म्हणाले.

पुढील काळात या ठिकाणी इमारतीचे बांधकाम होणार असून आधुनिक यंत्र सामग्री देखील उपलब्ध होणार आहे. त्यानंतर हळद संशोधन व प्रक्रिया केंद्र पुर्ण क्षमतेने सुरू होऊन त्याचा हळद उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

# बंजारा समाजालाही आरक्षण द्यावे- धर्मगुरू जितेंद्र महाराज



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

शासनाने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटीयर लागू केले. त्यानुसारच बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे अन्यथा रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन करणार असल्याचा इशारा पोहरादेवीचे बंजारा समाजाचे धर्मगुरू जितेंद्र महाराज यांनी दिला आहे.

हिंगोली येथील बंजारा समाजाच्या एका बैठकीसाठी धर्मगुरू जितेंद्र महाराज दि ७ सप्टेंबर रोजी हिंग- ोलीत आले होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी संतोष राठोड, रमेश राठोड, ज्ञा- नेश्वर चव्हाण, विजय जाधव, बाळासाहेब राठोड, प्रेमदास आडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना जितेंद्र महाराज म्हणाले की, शासनाने मराठा समाजाच्या आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटीयर लागू केले आहे. त्याच गॅझेटीयरमध्ये पान क्रमांक २३ वर बंजारा समाजाचे एसटी आरक्षण नमुद केले आहे. ज्याप्रमाणे मराठा समाजाला आ- रक्षण दिले त्याच धर्तीवर बंजारा समाजालाही एसटी प्रवर्गातून आरक्षण दिले गेले पाहीजे. या गॅझेटीयर व शासनाच्या निर्णयाचा आमची तज्ज्ञ मंडळी अभ्यास करीत असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणासाठी सुरूवातीच्या टप्प्यात शासनाला निवेदन दिले जाणार आहे. त्यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहे. यावेळी त्यांच्याकडे आमची मागणी मांडणार आहोत. मात्र त्यानंतरही आमच्या मागण्यांचा विचार न झाल्यास एकीकडे न्यायालयीन लढाई सुरू केली जाईल तसेच दुसरीकडे रस्त्यावर उतरून शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला. तेलंगणा, कर्नाटक राज्यात बंजारा समाजाला एसटी संवर्गातून आरक्षण आहे. बंजारा समाजाची आंध्रप्रदेश व महाराष्ट्राची केवळ भौगोलिक रचना बदलली आहे. मात्र सामाजिक, सांस्कृतिक रचना, बोली भाषा सारखीच आहे. त्याच धर्तीवर आम्ही महाराष्ट्रात एसटी संवर्गातून आरक्षण मागत आहोत. सध्या एसटी संवर्गातील आरक्षणाला धक्का न ला- वता आम्हाला आरक्षण देण्याची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायत अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान जिल्ह- ास्तरीय कार्यशाळा व पंचायत समिती यांची कार्यशाळा साई रिसॉर्ट येथे संपन्न झाली.

सदरील कार्यशाळेचे उद्धाटन आमदार तान- ाजीराव मुटकुळे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेवराव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत संजय कुलकर्णी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ खुणे, कार्यकारी अभियंता पदम ने, पाचही पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेला तालुका विभाग प्रमुख, जिल्ह्यातील सर्व सरपंच ग्रामपंचायत अधिकारी, हिंगोली तालुक्यातील ग्रामपंचायत ऑपरेटर, ग्रामरोजगार सहाय्यक यांची उपस्थिती होती. सर्व ग्रामपंचायत यांनी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २५ या कालावधीत अभियान राबवायचे आहे. त्यानंतर तालुका व जिल्हा परिषद यांचे मार्फत तपासणी करण्यात येणार आहे. उत्कृष्ट ग्रामपंचायत यांना शासनामार्फत बक्षीस देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्राम पंचायतमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होईल. त्यातून गावांचा विकास साधता येईल. तसेच गावे समृद्ध होणार आहेत.

प्रास्ताविक उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत गड्डापोड यांनी केले. प्रास्ताविकात बोलतांना सर्वांनी मुद्देनिहाय कामकाज करावे. या कार्यशाळेनंतर सर्व ग्राम पंचायत मध्ये कार्यशाळा घेऊन माहिती द्यावी नंतर १७ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात सर्व ठिकाणी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे.



**हिंगोली- राज्य शासनाने मराठा समाजाला आरक्षण देणारा जीआर काढल्यामुळे येथील मराठा समाजातील डॉक्टर्सनी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचा सत्कार केला. यावेळी डॉ यशवंत पवार, डॉ जयदीप देशमुख, डॉ गोपाल कदम, डॉ दिपक मोरे आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊमध्ये क्षमावाणी दिवस साजरा



हिंगोली- येथील राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत क्षमाव- ाणी दिन संपन्न करण्यात आला. यानिमित्त शाळेतील शिक्षक कान्हेड यांनी विद्यार्थ्यांना क्षमावाणी दिनाचे महत्त्व सांगितले, रोजच्या जी- वनात मानवाकडून कळत नकळत काही चुका होत असतात त्यामुळे त्या चुका पुन्हा होऊ नये यासाठी त्याबद्दल क्षमा मागून आपले जीवन आनंदी, सुखदायक होण्यास मदत होते तसेच क्षमा दिवस समाजातील सलोखा आणि शांती निर्माण करण्याचे महत्त्व दर्शवतो. अशी माहिती देण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, उपमुख्याध्यापक डोल्हारे, पर्यवेक्षक कान्हेड, पडघन, कान्हेड, ठोके, वाबळे, पाईकराव, मेटकर, टेकाळे आणि चाटसे इत्यादी उपस्थित होते

### ३२ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३२ वाहन चालकाविरूध्द पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांच्याकडून ३८ हजार २०० रूपयांचा दंड वसूल केला.

# बेरूळा येथील निळा झेंडा अवहेलना निषधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील बेरुळा येथे प्रशासनाच्या वतीने काढण्यात आलेला निळा झेंडा त्याच ठिकाणी सन्मानाने उभा करावा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी बौद्ध अनुयायांद्वारे ८ सप्टेंबर रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत हा झेंडा सन्मानपूर्वक लावण्यात यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील बेरुळा येथील शासकीय रस्त्यावरील चौकात निळा झेंडा उभारल्या प्रकरणी तालुका प्रशासनाद्वारे कार्यवाही करीत ५ ऑगस्ट रोजी निळा झेंडा काढण्यात आला होता परंतु सदर निळा झेंडा भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त चार वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला होता तसेच त्याविरोधात कुणाचीही तक्रार नसतांना प्रशासनाने निळा झेंडा काढण्याची कार्यवाही केली असल्याचा आर- ोप करीत सदर निळा झेंडा त्याच जागेवर सन्मानपूर्वक उभारण्याची मागणी बौद्ध समाजामार्फत केली जात होती. त्याअनुषंगाने ४ सप्टेंबर रोजी समाजाच्या प्रमुख नेत्यांसह उपविभागीय अधिकारी विकास माने, पोलिस उपविभागीय अधिकारी राजकुमार केंद्रे, तहसिलदार गाडे सरपंच टोपे यांच्या प्रमुख उपस्थितीत बेरुळा येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करून वाद संपुष्टात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु बैठकीत निळा झेंडा उभारण्याबाबत कोणतीही चर्चा किंवा निर्णय घेण्यात आला नाही. परिणामी कुणाचीही तक्रार नसतांना तालुका प्रशासनाने व पोलिसांनी बळाचा वापर करून ध्वज काढला, गावातील बौद्ध अनुयायांना अपमानास्पद वागणूक देत दमदाटी केली असल्याचा आरोप करून त्याच ठिकाणी ध्वज उभारण्याची मागणी करीत नियोजित लॉन्ग मार्च व बिऱ्हाड आंदोलनाला शनिवार दि ६ सप्टेंबर रोजी बेरुळा येथून सुरुवात केली. दरम्यान लॉन्ग मार्च व बिऱ्हाड आंदोलन ६ सप्टेंबर रोजी तालुक्यातील माथा येथे मुक्काम करून रविवारी औंढा शहरात आले. ७ सप्टेंबर रोजी बोरजा फाटा याठिकाणी बिऱ्हाडचा मुक्काम करण्यात आला. लॉन्ग मार्च व बिऱ्हाड आंदोलना द्वारे काढण्यात आलेला निळा झेंडा त्याच ठिकाणी पुन्हा उभारण्याच्या प्रमुख मागणीसह संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास यंत्रने मार्फत चौकशी करण्यात यावी, दोषींवर ॲट्रॉसिटी क्टनुसार कार्यवाही करण्यात यावी, तहसीलदार व पो- लीस निरीक्षक मोबाईल संभाषणाचे तपशील तपासून कार्यवाही करण्यात यावी आदी म ागण्या करण्यात येत आहेत. या आंदोलनात आंदोलनात दीक्षानंद साहेबराव साळवे, प्रमोद कुलदीपके, दिनेश हनुमंते, राहुल घोडके, जयदीप दीपके यांच्यासह बौध्द अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक लोकप्रतिनिधीकडून विकास कामात अडथळा

## हळद संशोधन केंद्राचे अध्यक्षांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

वसमत येथे होत असलेल्या हळद संशोधन केंद्रामध्ये आपल्या मर्जीतील ठेकेदारांना काम मिळावे यासाठी स्थानिक लोक्रतिनिधी अडथळा आणल्या जात असल्याचा खळबळजनक आरोप हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे आ. हेमंत पाटील यांनी केला आहे.

राज्य शासनाच्यावतीने वसमत येथे हळद संशोधन केंद्र मंजूर करण्यात आले आहे. मागील काळात या हळद संशोधन केंद्रासाठी १०० कोटी रूपये निधी मंजूर करण्यात आला होता. सदरील निधीतून संशोधन केंद्राचे काम सुरू झाले आहे. परंतु प्रकल्प पूर्ण कार्यान्वित होण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज आहे. असे असतांना प्रकल्पाला निधी मिळू नये यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी पत्रव्यवहार करीत आहेत. अर्थ खाते देखील यांच्याकडेच असल्यामुळे दोनशे कोटी रूपयांच्या निवीदा आठ महिन्यांपासून अडविण्यात आल्या आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधींना ही जागा मार्केट कमिटीच्या माध्यमातून शॉपींग कॉम्प्लेक्स बांधून त्यातील दुकानांची विक्री करायची होती. परंतु दहा ते बारा वर्षे जागा ताब्यात असू- नही त्यावर काहीही केले नाही. अखेर शासनाने शर्त भंग म्हणून ही जमीन परत घेतली व हळद संशोधन केंद्राला दिली. सदरील संशोधन केंद्राचे कामाचे कंत्राट मुंबई येथील कंपनीला देण्यात आले आहे.

# हिंगोलीत बाप्पाला दिमाखात निरोप, भव्य मिरवणुका, देखावे, जिल्ह्यात सर्वत्र शांततेत विसर्जन











**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ सप्टेंबर**

शहरात यंदाही परंपरेला साजेसा, भव्य आणि भक्तिपूर्ण गणपती विसर्जन सोहळा मोठ्या उत्स- ाहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा केला. ढोल-ताशांच्या गजरात, देखाव्यांच्या सजावटीत आणि जयघोषांच्या निनादात शहराने बाप्पाला निरोप दिला. जिल्ह्यात संपूर्ण मिरवणूक शांततेत पार पडल्याने नागरिक आणि पोलीस प्रशासन दोघांचेही कौतुक होत आहे.

हिंगोलीतील वंजारवाडा परिसरातील 'शेतकरी बाल गणेश मंडळ' यांची मिरवणूक विशेष लक्षवेधी ठरली. मंडळाने सजवलेले पौराणिक आणि सामाजिक विषयांवरील देखावे, पारंपरिक पोशाखातील घोडेस्वार, आणि तालात सादर होणारे ढोल-ताशांचे वादन यांनी वातावरण भारा- वून टाकले. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत, सर्व वयोगटातील भाविक मोठ्या संख्येने या मि रवणुकीत सहभागी झाले होते.पुढच्या वर्षी लवकर या! या पारंपरिक जयघोषात बाप्पाला निरोप देताना भाविकांचे डोळे पाणावले होते, हे दृश्य प्रत्येकाच्या मनात घर करून गेले. विसर्जन मि रवणुकीसाठी हिंगोली पोलीस प्रशासनाकडून काटेकोर बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन सेवांची तयारी यामुळे कोणतीही अनुचित घटना न घडता मिरवणूक शांततेत व सुरळीतपणे पार पडली. पोलीस अधीक्षक आणि स्थानिक यंत्रणेचे मिरवणूक मार्गावर नियमित निरीक्षण सुरू होते.

यंदाच्या विसर्जन सोहळ्यात हिंगोली नगरपालिकेने पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेत विविध भागांमध्ये कुंड्यादान सेवा पुरवली. नागरिकांनी घरोघरी मूर्ती विसर्जन करण्यासाठी या कुंड्यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला. मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या म ार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. त्यांनी सांगितले की, पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने कुंड्यादान हा छोटासा पण महत्त्वाचा टप्पा आहे. यंदा नागरिकांचा प्रतिसाद उल्लेखनीय होता. या उपक्रमामुळे नदी-तलावांवरील विसर्जनाचा ताण कमी झाला, आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूत- ींपासून जलप्रदूषण होण्याचे प्रमाणही घटले, असे पर्यावरणप्रेमींनी सांगितले.

विसर्जन सोहळ्यातील शिस्त, स्वच्छता, आणि संयम यामुळे हिंगोलीकरांनी आ- पली संस्कृती आणि एकजूट दाखवून दिली. अनेक गणेश मंडळांनी सोशल मीडियावरून हिंगोली पोलीस, नगरपालिका आणि स्वयंसेवकांचे विशेष आभार मानले आहेत.

हिंगोली शहराने यंदाच्या गणेशोत्सवात परंपरा आणि पर्यावरणपूरकता यांचा सुंदर समन्वय साधत बाप्पाला निरोप दिला. विसर्जन मिरवणुकीतील भव्यता, देखावे आणि शिस्तीने सर्वत्र कौतुकाचा विषय झाला आहे. जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विसर्जनाच्या भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मंठ्यात जिल्हा परिषदेच्या शाळेच्या जागेवर अतिक्रमण धारकाने बांधली टोलेजंग इमारत

## प्रशासनाचे दुर्लक्ष; मंठेकरांकडून होऊ लागली संबंधीतांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मंठा शहरातील मुख्य रस्त्यावरील जिल्हा परिषद शाळेच्या रिकामया जागेत दोन अतिक्रमण धारकांनी अतिक्रमणे करून मालकीची दुकाने थाटली. मुख्य रस्त्यावरील अंदाजे तीन कोटी रूपयांची मालमत्ता आहे, या प्रकरणी अनेक वृत्तपत्रात बातमया देखील प्रकाशित झाल्या, तसेच सामाजीक कार्यकर्ते दिगांवर बोराडे व प्रदीप वाघमारे यांनी जिल्हा परिषद कार्यालयातील मुख्याधिकारी तक्रारीचे निवेदन देऊनही अतिक्रमण हटविण्यात आले नाही. मंठा शहरातील शासकीय जागेवरील अतिक्रमणे राजकीय पुढाऱ्यांचे असल्याने संबंधीत मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी, नगर पंचायतचे मुख्याधिकारी ह्यांनी अतिक्रमण हटविण्यासाठी कोणतेही ठोस पाऊले उचलली नाहीत. संबंधीत अतिक्रमण धारक शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख असल्याने शाळेचे मुख्याध्यापक ह्यांच्या दडपणाखाली येऊन त्यांनी अतिक्रमण हटविण्यासाठी नगर पंचायतच्या मुख्याधिकाऱ्यांकडे बोट दाखविले, मात्र नगर पंचायतच्या हद्दीत येत नसल्याने संबंधीत शाळेचे सरंक्षण भिंतीचे अतिक्रमण हे हद्दीत नसल्याने मुख्याध्यापकांना नोटीस काढत पुन्हा शाळेच्या मुख्याध्यापकडेच नगर पंचायतने बोट फिरवले आहे. एकंदरीत ही जागा शाळेची असुन सदर जागेवर दोन इमारत बांधत असतांना शाळा प्रशासनाने कुठलीच कारवाई केली नाही. उलट अतिक्रमण करण्यास सहकार्य केले. या सहकार्याच्या बदल्यात त्यांना केणता मेवा मिळाला





असे नागरीक चर्चा करीत आहेत.

सदर शाळेच्या अतिक्रमणाबाबत मंठा येथील माजी ग्रा.पं.सदस्य तथा माली पाटील विजय बोराडे व प्रदीप वाघमारे यांनी सहा महिने प्रयत्न केले. परंतु शाळा प्रशासनाने कोणाचे प्रयत्न न जुमानता व मुख्याधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत शाळेचे मुख्याध्यापक चौकशी, शिवाजी देशमुख, संतोष विटकर यांनी प्रकरण दाबले. त्यांना अतिक्रमण प्रकरणी कोणी विचारणा केल्यास तात्काळ ते संबंधीत अतिक्रमण कर्ते प्रदीप बोराडे यांना सुचना करतात. लगेच सुचना मिळाल्यानंतर प्रदीप बोराडे हे दबाव टाकतात. अर्ज दिला असल्यास त्याला मॅनेज करतात. सदर बोराडे हा

> **जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री.चौधरी या संबंधी विचारणा करण्यासाठी दुरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कुठलाही प्रकारे प्रतिसाद दिला नाही.**

अनेक ठिकाणी रिकामया जागेवर कब्जा करतो. मंठा फाट्यावर देखील रिकामी जागा ताब्यात घेऊन अतिक्रमण केले तर देवी रोड ला देखील केला जागा ताब्यात घेऊन अतिक्रमण केले. नंतर ते प्रकरण मिटवण्यात आले. आता मुलांच्या हक्काच्या शिक्षण घेण्याच्या ठिकाणी डल्ला मारत मोठी जागा ताब्यात घेतली आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी जागा ही राजकीय पुढारी ताब्यात घेऊन पैशाच्या व बळाचा जोरावर असे कृत्य करत आहे. परंतु स्थानिक व शाळा प्रशासन मॅनेज होऊन थंड झाले. पण जिल्हा परिषद प्रशासन यावर कुठलीच कारवाई नाही. याचे मात्र मंठा वासीयांना नवल वाटत आहे. सदर जागेवर इमारत बांधण्यासाठी तबल सहा महिने लागले. परंतु बांधकाम थांबवण्याचा साधा प्रयत्न सुध्दा मुख्यध्यापक यांनी केला नाही. याचे ही कारण कोणाला कळेनासे झाले. वारवार निवेदन देऊन देखील याची दखल घेत नसल्याने प्रशासन हतबल झाल्याचे दिसून येते. राजकीय दबाव वापरू जागा हडप करण्याचा धंदा केंव्हा थांबणार, विद्यार्थ्यांना न्याय मिळणार का? यासह असंख्य प्रश्न उपस्थित होत आहे. आता नविन मुख्याधिकारी यांनी याप्रकरणी योग्य लक्ष देऊन कारवाई करावी अशी अपेक्षा मंठेकर करू लागले आहेत.

---

## संक्षिप्त

### फारुक शेख यांचा आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट जिल्हा प्रतिनिधी पुरस्काराने सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

शिक्षक दिन आणि दैनिक समर्थ राजयोग या लोकप्रिय दैनिकाच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२५ शुक्रवार, दि.५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,नगर रोड, बीड येथे अत्यंत भव्य, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या प्रेरणादायी सोहळ्यात विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. विशेषतः पत्रकारितेच्या क्षेत्रात समर्पित कार्य करणाऱ्या दैनिक समर्थ राजयोग चे जालना जिल्हा प्रतिनिधी श्री. फारुक शेख यांना 'आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट जिल्हा प्रतिनिधी पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला.फारुक शेख यांचा गौरव जिल्ह्याचा अभिमान मा.श्री.जतीन रहमान (मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड) यांच्या शुभहस्ते फारुक शेख यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. फारुक शेख हे जालना जिल्ह्यातील एक निर्भीड,सजग आणि समाजाभिमुख पत्रकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या पत्रकारितेचा केंद्रबिंदू केवळ बातम्या देणे नव्हे,तर समाजघटनात सक्रिय सहभाग घेणे,हे आहे.त्यांनी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना विशेष मान्यता मिळाली.तसेच,अंबड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आवाज उठवला,आंदोलने केली आणि लोकप्रतिनिधींना जनतेच्या समस्या पोहोचवण्यासाठी माध्यम बनले.पत्रकार हा केवळ लेखक नाही, तो लोकांच्या भावना मांडणारा लोकप्रतिनिधी असतो, असे श्री. फारुक शेख यांनी पुरस्कार स्वीकारताना सांगितले. पत्रकार संघटनांच्या बांधणीसाठी योगदान फारुक शेख हे केवळ बातम्यांच्या मागे धावणारे पत्रकार नाहीत,तर पत्रकार संघटनांच्या बांधणीसाठी, हक्कासाठी आणि सन्मानासाठी झटणारे कार्यकर्ते आहेत. पत्रकारांच्या सुखदुःखात सहभागी होणारे,अन्यायाविरुद्ध न डगमगता उभे राहणारे, समाज,राजकारण,क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये सक्रिय असणारे असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे.या सर्व योगदानाच्या पार्श्वभूमीवर 'आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला, ही संपूर्ण जिल्ह्याच्या पत्रकारितेची प्रतिष्ठा वाढवणारी बाब ठरली आहे.जिल्ह्यातून सर्वच स्तरातून त्यांचे उत्स्फूर्त अभिनंदन करण्यात येत आहे.

### आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आणीबाणीच्या कालावधीत बंदिवास सोसाव्या लागलेल्या व्यक्तींचा सन्मान, यथोचित गौरव करण्याबाबतची योजना नव्याने सुरु करण्यात आली आहे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नव्याने अर्ज सादर करण्याचा अंतिम २४ नोव्हेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. तरी आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्ती अथवा वारस पत्नी, पतीने आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि. ०२/०१/२०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या हयात जोडीदार पती, पत्नी केवळ अशा व्यक्तींनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरीता दि. २५सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करण्याची मुभा दि.२७/०६/२०२५ च्या शासन शासन निर्णयान्वये देण्यात आली होती. त्यानुसार अशा आणीबाणीधारकांच्या जोडीदारांनाही (पती/पत्नी) यांनी दि.२७/०६/२०२५ च्या शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांची अर्ज दाखल करण्याची मुभा राहील. तरी पात्र आणीबाणीधारकांनी विहित मुदतीत जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे अर्ज सादर करावेत. मीसा/डी.आय. आर (आणीबाणी) खाली राजनैतिक अथवा सामाजिक कारणासाठी अटक झालेल्या संबधीत जिल्हा पोलीस अधिक्षक/कारागृह अधिक्षक यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावेत.

---

# अस्थिंचे विसर्जन न करता आईच्या स्मरणार्थ केले वृक्षारोपण

## सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांचे कौतुकास्पद कार्य



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांनी आपल्या आईच्या निधनानंतर अस्थिंचे विसर्जन न करता त्या ठिकाणी वृक्षारोपण केले. त्यांच्या या कार्याचे शहर परिसरात कौतुक होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांच्या आई कौशल्याबाई दादाराव पाडेवार यांचे २४ ऑगस्ट रोजी निधन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर असलेल्या तलावाजवळली स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. परंतु अंत्यसंस्कारानंतर पाडेवार यांनी अस्थिंचे विसर्जन न करता त्या ठिकाणी एका वृक्षाची लागवड केली. त्यांच्या या सामाजिक कार्याचे सध्या शहर परिसरात कौतुक होत आहे. यावेळी तातेराव पाडेवार, गणेश पाडेवार,विलास पाडेवार, लिंबाजी पाडेवार, विठ्ठल पाडेवार, ऊत्तम घुगे,राजु पाडेवार, विक्रम गायकवाड,नामदेव ढोले, किशोर वाकळे उपस्थिती होती.

> अंत्यसंस्कारानंतर नदी प्रवाहात अस्थिंचे विसर्जन करण्याची आपल्याकडे परंपरा आहे. परंतु सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी अस्थिंचे विसर्जन न करता त्या ठिकाणी एका वृक्षाची लागवड केली. हा खरोखर एक कौतुकास्पद उपक्रम आहे. झाडाच्या रूपाने आईची स्मृती कायम लक्षात राहील. तसेच या कृतीने पर्यावरणाचे जतन करणे किती आवश्यक आहे हे देखील अधोरेखित होते. – **डॉ. भगवानराव दिरंगे, निवृत्त प्राचार्य, ला.ब. शा. वरिष्ठ महाविद्यालय, परतूर.**

---

# श्री छत्रपती संभाजी विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षक दिनाचे महत्त्व खूप आहे. शिक्षक विद्यार्थ्याला योग्य भविष्य आणि योग्य मार्गावर चालायला शिकवतो. तो विद्यार्थ्याला चांगल्या आणि अयोग्य गोष्टींची समज शिकवतो. अशा परिस्थितीत, विद्यार्थ्याला या दिवशी शिक्षकांच्या मेहनतीबद्दल आभार मानण्याची संधी मिळते. म्हणून हा दिवस सर्व विद्यार्थ्यांसाठी खूप खास मानला जातो. भोकरदन तालुक्यातील श्री छत्रपती संभाजी विद्यालय तादुंळवाडीत स्वयं शासन दिना निमित्त डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण शाळेचे प्राचार्य संजय पैठणकर यांनी केले. त्यानंतर शाळेतील १० वीच्या विद्यार्थ्यांनी स्वयं-शासनदिनानिमित्त ५ वी ते ९ वीच्या वर्गामध्ये दिवसभर अध्यापन करून स्वयंशासन हा उपक्रम राबविला.यावेळी प्रत्येक वर्ग शिक्षकांचेसहकार्य व मार्गदर्शन लाभले.यामुळे मोठ्या उत्साहात



विद्यार्थ्यांनीच शाळेत अध्यापनासह स्वयंशासन यशस्वीरित्या राबवले.

यावेळी प्रत्येक वर्ग शिक्षकांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. शाळेचे प्राचार्य संजय पैठणकर यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. स्वयं-शासन दिन निमित्त श्रेयशी रत्नाकर रोड मुख्याध्यापिका म्हणून काम केले. तर प्रतिक्षा नारायण राजरवाड शिवानी दादासाहेब सोनवणे.ज्ञानेश्वरी रामेखर सोनवणे,पूजा विष्णू शिंदे,श्रावणी लक्ष्मण धुमाळ,वैष्णवी बालाजी सोनवणे,श्रुती संजय जाधव, श्रुती नारायण बनकर,कल्याणी दत्ता गायके , संचिता हरिदास वेलदोडे यांनी शिक्षिका म्हणून काम केले तर शिक्षक म्हणून शिवम रामदरास कोठाळे, शिवम सतिश देशमुख ,सोमेश रमेश भोकरे ,वैभव रामेश्वर जाधन,धिरज गायकवाड यानी काम पाहिले तर सेवक म्हणून..वैभव आनंदा चिकटे,एकनाथ सुरासे यांनी काम केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सहशिक्षक डी बी ठाकरे,पी एम पाटील,मोहित जयस्वाल,सौ उषाताई खैरे मॅडम,सौ कमल सोनवणे,सौ आशाताई ठाकुर,प्रा अंकुश जाधव,प्रा भगवान जाधव,जे एच सुरासे,एम बी भंडारे,एच यु गव्हाड या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.


---

# बदनापुर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करावी; शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या कडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

बदनापुर तालुक्यात रोजगार निर्मितीसह विकासाला चालना देण्यासाठी बदनापुर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांच्या कडे केली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना पदाधिकारी बैठकीनिमित्त ना. सामंत आले असता जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्र्यांची भेट घेऊन बदनापुर च्या रखडलेल्या औद्योगिक विकासाबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन दिले. यावेळी शिवसेना उपनेते, विधान मंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ.अर्जुनराव खोतकर, शिवसेनेचे सचिव संजय मोरे, भाऊसाहेब चौधरी, खा. राहुल शेवाळे युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर , फेरोजलाला तांबोळी,ड.सुनील किनगावकर, ए. जे .बोराडे, ड.भास्कर मगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



भाऊसाहेब घुगे यांनी बदनापुरचा अनुशेष भरून काढण्या बाबत ना.सामंत यांच्याशी चर्चा करतांना सांगितले की, बदनापुर तालुका निर्माण होऊन ३३ वर्षे उलटली तरी अद्याप ही औद्योगिक वसाहत स्थापन झाली नसल्याने तालुक्यातील युवकांना रोजगारासाठी जालना आणि छत्रपती संभाजी नगर कडे धाव घ्यावी लागते. असे भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तथापि बेरोजगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा तसेच नव उद्योजकांना उद्योग उभे करता यावे यासाठी बदनापुर येथे जलदगतीने औद्योगिक वसाहत स्थापन करावी अशी मागणी भाऊसाहेब घुगे यांनी केली. यावेळी शिवसेनेचे बदनापुर तालुकाध्यक्ष कल्याणराव अवघड ,तालुका संघटक भगवानराव मदन, विधानसभा संघटक कैलास दुधानी युवासेना तालुकाप्रमुख ईश्वर पाटील जुंबड, प्रवीण पाटील फुके, तालुका संघटक अमोल दाभाडे, शहर प्रमुख अंबादास कोळसकर, महिला आघाडी तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, युवासेना विभाग प्रमुख रामभाऊ दराडे ,सोशल मीडिया प्रमुख देवा ढाकणे आदींची उपस्थिती होती.

---

# मातोश्री पांदण रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार; गावकऱ्यांनी दिला उपोषणाचा इशारा!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील मौजे पाडळी दुधा येथील मातोश्री पाणंद रस्ता (रोहयो) कामातील भ्रष्टाचारावर चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेकडून निघूनही अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने ग्रामस्थांत प्रचंड रोष निर्माण झाला आहे. चौकशी अधिकाऱ्यांनी रोजगार सेवक व तांत्रिक अधिकाऱ्यांना पाठीशी घालत मुद्दाम चौकशी थांबविल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यामुळे संतापलेल्या गावकऱ्यांनी दि. ८ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. ग्रामस्थ प्रसाद अप्पाराव घुगे व बालासाहेब गुलाब घोरसड यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेश देऊनही संबंधित चौकशी अधिकारी वारंवार विनंती करूनही चौकशी करत नाहीत. चौकशी मुद्दाम थांबवली जात असून भ्रष्टाचार झाकला जात आहे. त्यामुळे आता रस्त्यावर उतरून न्याय मिळवण्यासाठी आम्ही अमरण उपोषण करणार आहोत. आमच्या उपोषणादरम्यान काहीही अनिष्ट घडल्यास त्यास प्रशासन जबाबदार असेल. 'सोबत संबंधित कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत.

---

# हिरव्या झेंड्याविरोधात जैन समाजाचे प्रशासनाकडे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या महावीर चौकात हिरवा झेंडा लावण्यात आल्याने जैन समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त झाला आहे. महावीर चौक हा जैन समाजासाठी धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठिकाण असून, येथे भगवान महावीर स्वामी यांचे स्मृतीचिन्ह आहे. या धार्मिक स्थळावर अशा प्रकारची अनधिकृत कृती झाल्यामुळे समाजाच्या धार्मिक भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत.

यासंदर्भात जैन समाजाच्या वतीने जालना महानगरपालिका आयुक्त, मा. पोलीस निरीक्षक, सदर बाजार पोलीस स्टेशन तसेच मा. पोलीस अधीक्षक जालना यांना स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली आहेत. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि.७ सप्टेंबर रोजी महावीर चौक परिसरात हिरवा झेंडा लावलेला आढळून आला आणि



हा प्रकार शहरातील शांतता, सुव्यवस्था व सामाजिक ऐक्य बिघडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.

सकल जैन समाज सेवा व सकल हिंदू समाजाच्या वतीने बोलताना अक्षय गोरंट्याल म्हणाले, अलीकडेच आमच्या महावीर भगवान यांच्या स्मारक सेवापुतळा चौकात चुकीची घटना घडली. त्या ठिकाणी हिरवा झेंडा लावण्यात आला होता. तो आम्ही काढून टाकला असून, समाज व सकल हिंदू समाजाने गोमूत्राने पूर्ण परिसराची स्वच्छता करून पुन्हा आमचा झेंडा लावला आहे. यापूर्वीच आम्ही सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार व अनेक निवेदनं दिली होती. आता या घटनेनंतर आम्ही महापालिकेतही निवेदन देणार आहोत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून पुरावे मिळतील आणि त्यावर योग्य कारवाई व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. पोलिसांना आमची एकच विनंती आहे की अशा घटना सतत घडू नयेत. मागील १ तारखेलाही अशीच घटना घडली होती. त्या वेळी तत्पर कारवाई केल्याबद्दल आम्ही पोलीस प्रशासनाचे आभार मानतो. मात्र फक्त सात दिवसांत पुन्हा दुसरी घटना घडली आहे. यावरून स्पष्ट होते की काही विपरीत बुद्धीचे लोक समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. सकल हिंदू समाज व सकल जैन समाज शांततेने व संयमाने मार्ग काढत आहेत. मात्र तिसऱ्यांदा अशी घटना घडली तर आम्हालाही विचार करावा लागेल की आम्ही शांत राहावे की कठोर भूमिका घ्यावी. हे विपरीत बुद्धीचे लोक कोणत्यातरी संघटनांचे प्यादे असल्याचे दिसते. तरीही, आजपर्यंत आम्ही संयमाने मार्ग काढला आहे. पण पुन्हा अशी घटना घडली, तर आम्ही त्याचा तीव्र निषेध करू आणि कुणालाही माफ करणार नाही. शेवटी, प्रशासनाचे आम्ही आभार मानतो. पण आमची भाषा समजत नसेल, तर यानंतर त्यांना त्यांचीच भाषा ऐकवावी लागेल. जैन समाजाने दिलेल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, सदर कृती भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २९९ व ३९८ अंतर्गत दंडनीय आहे. त्यामुळे संबंधित दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाकडे महावीर चौकातून हिरवा झेंडा तात्काळ काढण्याची, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी परिसरात नियमित प्रशासकीय देखरेख व सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची, तसेच महावीर चौकाचे स्वच्छता, सौंदर्यीकरण व योग्य देखभाल सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे जैन समाजामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, शहरातील धार्मिक सलोखा अबाधित राहावा याकरिता प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी समाजाची अपेक्षा आहे. समाजाने स्पष्ट केले आहे की, या घटनेवर तत्काळ लक्ष न दिल्यास धार्मिक भावना दुखावल्या जाण्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## आश्चर्यम! वर्षभरात दशलक्ष भाविक अन् कोट्यावधीचे उत्पन्न तरीही

# श्री रेणुकादेवी संस्थानवर ०८ वर्षांपासून प्रभारी व्यवस्थापक !

**तभा वृतसेवा**
**माहूर , दि. ८ सप्टेबर-**

राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले नांदेड जिल्ह्यातील माहूर येथील श्री रेणुकादेवी देवी मंदिर, येथे त्याचा विकास आणि एकूणच विकास आराखड्याच्या संदर्भात प्रशासकीय स्तरावर अतिशय अनास्था दिसून येते. वर्षभरात जवळपास एक दश लक्ष भाविकांचे आगमन आणि त्याद्वारे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न असणारे श्री रेणुकादेवी मंदिर संस्थान हे अन्य देवस्थानच्या तुलनेत आर्थिक अन् सर्वच दृष्टीने समृद्ध असूनही मंदिर परिसराचा विकास न होण्यास प्रामुख्याने प्रशासकीय आणि शासकीय पातळीवरील उदासीनताच कारणीभूत असल्याचे दिसून येते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे श्री रेणुकादेवी मंदिर संस्थानवर २०१७ पासून आजपर्यंत तब्बल ०८ वर्षांपासून प्रभारी व्यवस्थापक कार्यरत असून,त्यांच्याकडून संस्थानच्या घटनेतील अनेक तरतुदींना बगल देत नियमबाह्य व्यवस्थापन होत असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत.

श्री क्षेत्र माहूरगड येथील श्री रेणुका देवी मंदिर संस्थानवर सन २०१७ पासून आजपर्यंत प्रभारी व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले व्यवस्थापक यांच्याकडून संस्थानच्या घटनेतील अनेक तरतुदींना बगल देत नियमबाह्य व्यवस्थापन होत असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. तत्कालीन अनुभवी व्यवस्थापक पी.डी. चव्हाण यांच्या निवृत्तीनंतर श्री रेणुका देवी मंदिर संस्थानवर वाढती भाविकांची गर्दी व संख्या पाहता याठिकाणी एका कायमस्वरूपी व्यवस्थापकाची नेमणूक होणे भाविकांच्या सोयीसाठी व मंदिर संस्थानच्या विकासासाठी आवश्यक होते.परंतु, तसे न करता गेल्या ०८ वर्षांपासून प्रभारी व्यवस्थापकाच्या माध्यमातून संस्थानचा व्यवस्थापन कारभार चालविण्यात येत असल्याने भाविकांमधून आश्चर्यासह तिव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सर्वात मोठे आश्चर्य म्हणजे संस्थानातील पहिले लेखापाल विनोद सरतापे हे उपलब्ध असूनही, कनिष्ठ श्रेणीतील लेखापाल योगेश साबळे यांच्याकडे प्रभारी व्यवस्थापक पदाची जबाबदारी देण्यात आली. ही कोणत्यास्वरुपाची तडजोड आहे हे एक न उलगडणारे कोडे आहे.या पार्श्वभूमीवर मुंबईतील माता श्री रेणुका देवीचे एक भाविक कुणाल पारशिवणीकर यांनी यापूर्वीच संस्थानवर राजपत्रित अधिकारी व्यवस्थापक म्हणून नेमावा, अशी लेखी मागणी केली होती. हे येथे विशेष उल्लेखनीय आहे.



माहूर सारख्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या तिर्थक्षेत्री व्यवस्थापकाचे महत्त्व आध्यात्मिक व्यवस्थापन, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करणे, तसेच भाविक आणि पर्यटकांना योग्य सुविधा पुरवणे यात आहे. या पवित्र स्थळांची देखभाल करणे आणि त्यांच्या अखंड, संतुलित ऊर्जा टिकवून ठेवणे,जेणेकरून ते देवी उपासकांसाठी एक महत्त्वाचे केंद्र राहतील.

व्यवस्थापकाला शक्तिपीठांच्या पूजेची आणि धार्मिक कार्यांची व्यवस्था पाहावी लागते,ज्यामुळे देवीची ऊर्जा स्थिर आणि प्रभावी राहते. शक्तिपीठाची शांतता आणि पावित्र्य राखणे हे व्यवस्थापकाचे मुख्य काम असते, जेणेकरून भाविक येथे भक्तीभावनेने येऊन शक्ती अनुभवू शकतील. माहूर हे शक्तिपीठ केवळ धार्मिक स्थळ नसून, ते महाराष्ट्राच्या आणि भारताच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचा भाग आहे.या स्थळाच्या ऐतिहासिक आणि पौराणिक कथांचे जतन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचे व्यवस्थापकाचे कार्य आहे. तसेच या शक्तिपीठास येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक असलेल्या निवास, स्वच्छता आणि इतर सोयीसुविधांची व्यवस्था करणे हे व्यवस्थापकाचे मुख्य काम असून,नियमित देखभाल, परिसराची स्वच्छता आणि सुरक्षा तसेच पर्यटकांना आवश्यक मार्गदर्शन पुरवणे हे व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्यांमध्ये येते.या शक्तिपीठावरील संतुलित ऊर्जा संपूर्ण भारताच्या आध्यात्मिक स्थितीचे नियंत्रण करते असे मानले जाते. व्यवस्थापक या ऊर्जेची शुद्धता आणि स्थिरता राखण्यासाठी महत्त्वाचे कार्य करतात, ज्यामुळे नकारात्मक शक्तींपासून संरक्षण होते.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, हे व्यवस्थापक केवळ मंदिराचे व्यवस्थापन करत नाहीत, तर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक स्थळांचे रक्षण आणि संवर्धन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

परंतु, यासाठी माहूर सारख्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या तिर्थक्षेत्री जर कायम स्वरुपी व्यवस्थापकाची नेमणूकच तब्बल आठ वर्षांच्या प्रदीर्घ काळापासून झाली नसेल तर प्रभारी व्यवस्थापक काय दिवे लावतायेत हे गेल्या काही वर्षांपासून संस्थानवर साजरे करण्यात येणाऱ्या डझनभर यात्रोत्सवातील ढेपाळलेल्या व ढासळलेल्या नियोजन व्यवस्थेवरुन स्पष्ट दिसून आले आहे.

त्याचे आणखी एक उदाहरण म्हणजे,संस्थेच्या घटनेतील कलम ९५(५) ला बगल देण्यात येऊन दर पंधरा दिवसांनी देवीला चढावा स्वरूपात आलेले साडीपातळ लिलाव करणे बंधनकारक असतानाही तो लिलावच बंद असून, इतर अनेक नियमांची अंमलबजावणी सुद्धा रखडलेली असल्याचे दिसून येत आहे. यामुळे व्यवस्थापन सुधारण्यासाठी कायमस्वरूपी प्रशासकीय व्यवस्थापक नेमण्याची मागणी भाविक व नागरिकांतून होत आहे.येत्या २२ सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या प्रशासकीय विश्वस्तांच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा भाविक व स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### प्रवाशांशी उद्धटपणे वागणाऱ्या महिला वाहकाविरुद्ध महिला प्रवाशाची तक्रार

**मुदखेड** -परिवाहन मंडळाच्या बसने प्रवास करित असताना महिला प्रवासी यांना थांबा नसल्याचे कारण देत तिकिट नाकारल्याने बसस्थानकात दोन तास प्रवाशांना ताटकळात बसावे लागले असून वाहकाच्या मुजोरीने प्रवास करणाऱ्या एकट्या महिलेला खाली उतरावे लागले. याप्रकरणाची चौकशी करून मुजोर वाहकावर करवाई करण्याची तक्रार सुरेखा वानोळे यांनी परिवाहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. नांदेड मार्गी भोकर जाणाऱ्या महिला प्रवासी सुरेखा वानोळे बाबनवाडी ( ता.भोकर) यागावी अंत्यविधीसाठी निघाले होते नांदेड बसस्थाक येथून मनोज वानोळे यांनी दि.५ (शुक्रवार) दुपारी २ वाजता बस क्र. एम.एच.१३ सी यू ७२४९ या बसमध्ये सुरेखा वानोळे यांना बसून दिले होते. यावेळी वाहकास सगळ्या बसस्थानकावर बस थांबेल का अशी विचारणा सुद्धा केली होती. यानंतर वाहकांनी सुट्टे पैसे घेऊन बस मध्ये प्रवास करा असे सांगीतले यानंतर वाहक शिवनंदा बालाजी रेणके यांना बस मध्ये दहा किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर बाबनवाडी यागावचे तिकिट देण्यास सांगीतल्यानंतर बस थांबत नसल्याचे कारण सांगून भोसी किंवा वागद तिकिट घ्या असे सांगितल्यानंतर अंत्यविधीचे महत्वाचे काम असून बाबनवाडीला थांबवा अशी विनंती केली परंतु वाहकाने मुजोरीची भाषा वापरत बारड बस स्थानकावर दोन तास गाडी थांबून एकटी महिला प्रवासी असल्याने दमदाटी केली व खाली उतरण्यास सांगितले. यामुळे बसमधील प्रवाशांना ताटकळत बसण्याची वेळ आली. या मुजोर वाहकामुळे नातेवाईकाचा अंत्यविधी तर मिळालाच नाही परंतु नाहक त्रास त्रास सहन करावा लागला आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करून प्रवाशांशी उद्धटपणे वागणाऱ्या महिला वाहकावर कठोर कारवाई करण्याची मागणी तक्रारी द्वारे आगार प्रमुख भोकर यांच्याकडे केली आहे. यासोबतच पोलीस ठाण्यातही तक्रार देण्यात आली आहे.

### महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोधात महाविकास आघाडीचे बुधवारी निदर्शने

**नांदेड** -महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हे घटनाविरोधी व लोकशाहीला बाधक असून जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे आहे. सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मोस्कटदाबी व्हावी व हुकूमशाही यंत्रणा बळकट व्हावी हाच कुटीत हेतू या विधेयकाच्या माध्यमातून साधला जाणार आहे. अशी महाविकास आघाडीची भुमिका असून या विधेयकाच्या विरोधात, महाविकास आघाडीच्या वतीने राज्यभर निदर्शने आंदोलन करणार येणार आहेत. दरम्यान बुधवार दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ महाविकास आघाडीच्या वतीने निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आली आहे.

### मुनेश्वर दाम्पत्याचा निवडणूक लढविण्याचा निर्धार

**किनवट** - नगर परिषदेच्या नव्या प्रभाग रचनेनंतर इच्छुक उमेदवारांनी आपापल्या रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर व सौ. ललिता मारोती मुनेश्वर यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. त्यांनी प्रभाग क्रमांक ७ मधून अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. वर्ष २०१७ मध्ये नाट्यमय घडामोडी घडताच मुनेश्वर यांची उमेदवारी भाजपकडून वगळण्यात आली होती. मात्र, त्यांनी त्यावेळी प्रभाग क्रमांक २ मध्ये प्रचंड मेहनत घेऊन काम केले होते. नव्या प्रभाग रचनेनुसार तोच विभाग आता प्रभाग क्रमांक ७ झाला आहे. या वेळी कोणत्या पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवायची याचा निर्णय वेळेप्रसंगी परिस्थितीजन्य विचार करून घेतला जाईल, असे मुनेश्वर दाम्पत्याने स्पष्ट केले आहे. मागील कटु अनुभवामुळे यावेळी अधिक सावधगिरीने पावले टाकली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, प्रभाग क्रमांक ७ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी असलेली जागा महिलांसाठी राखीव राहील की सर्वसाधारण (पुरुष) यावर अंतिम आरक्षण ठरल्यावर उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.



### शिवभिम सेनेच्या उत्तर जिल्हाध्यक्षपदी मूस्तापूरे यांची निवड

**भोकर**-येथील सामाजीक कार्यकर्ते शिवभिमसेनेचे भोकर तालूका अध्यक्ष यांची उत्तर विभागीय जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. चंद्रकांत मूस्तापूरे यांनी अनेक वर्षापासून सामाजीक चळवळीत कार्यरत आहेत त्यांना शिवभिमसेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदिनाथ सोमवंशी यांनी मूस्तापूरे यांचेवर भोकर तालूका अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली होती दरम्यानच्या कार्यकाळात विविध समाजोपयोगी कार्य केले त्यांनी केलेल्या सामाजीक कार्याची दखल घेवून त्यांची नांदेड उत्तर विभागीय जिल्हाध्यक्ष पदी निवड केली आहे.



## डोंगरगाव शिवारात वीज कोसळून चार गायीसह गोठा जळून खाक

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ८ सप्टेबर-**

मुदखेड तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील शेतकऱ्याच्या शेतातील गोठ्यावर अचानकपणे वीज कोसळून चार गाई दोन वासरे तसेच शेती उपयोगी साहित्य पूर्णतः जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे त्या शेतकऱ्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दि. ७ सप्टेंबर रविवार रोजी सायंकाळी ८.३० सुमारास अचानक डोंगरगाव शिवारात रिमझिम पाऊस वीजांचा कडकडाट सुरू झाला या शिवारातील शेतकरी किशनराव भुजंगराव व्यवहारे रा.डोंगरगाव यांच्या शेती गट क्रमांक १५२ मध्ये शेतातील गोठ्यावर अचानकपणे वीज कोसळली असून यात चार गायी व दोन वासरे तसेच २० पीयूसी पाईप, तुषार संच, फवारणीची पिचकारी, जनावरांचे खाद्य इ.शेती उपयोगी साहित्य पूर्णतः गोठा जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.



या घटनेनंतर दि.०८ सप्टेंबर सोमवार रोजी मुदखेड महसूल प्रशासनाकडून तलाठी एस. डी. देवापूरकर, मुदखेड तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रणिता पेंडकर, डॉ. एस. एस. बंडेवार, पशुधन पर्यवेक्षक एस.एम. वारकड, पंच सरपंच शिवानंद पांडुरंग पुयड, विजय गोपीराज व्यवहारे, शिवानंद नागोराव व्यवहारे, शेतकरी किशनराव व्यवहारे, पत्रकार रुखमाजी शिंदे, अमोल टेकले, सतीश व्यवहारे, गोपीराज व्यवहारे, सुनील व्यवहारे, अनिल व्यवहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचनामा करून सदर अहवाल जिल्हा प्रशासनाकडे पाठवण्यात आल्याची माहिती दिली आहे.या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## गोदावरी अर्बनचा गणेशोत्सवात स्तुत्य उपक्रम : विद्यार्थ्यांच्या हृदयावर कोरली किल्ले संवर्धनाची प्रतिज्ञा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ सप्टेबर-**

भक्ती, सामाजिक एकता आणि संस्कारांचा सण असलेल्या गणेशोत्सवाला यंदा गोदावरी अर्बनने एक वेगळा शैक्षणिक व समाजजागृतीचा रंग दिला आहे. सहकारसूर्य मुख्यालयात किल्ले संवर्धन व अर्थसाक्षरता या अनोख्या संगमातून उपक्रम राबविण्यात आला असून, शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

संस्थेचे संस्थापक ना. हेमंत पाटील यांच्या संकल्पनेतून, अध्यक्ष राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या नियोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये युनेस्को मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील ११ किल्लयांसह महाराष्ट्राबाहेरील एका किल्लयाचा देखावा उभारण्यात आला आहे. किल्लयांच्या रचनेतून व शौर्यगाथेतून विद्यार्थ्यांना इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

दररोज सकाळ-संध्याकाळच्या आरतीवेळी शाळा व शिकवणीतील शंभर विद्यार्थी सहभागी झाले. उपक्रमाच्या दरम्यान दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी किल्ले व सांस्कृतिक वारसा जतन करण्याची शपथ घेतली. इतिहासाबरोबरच आर्थिक शिस्तीचे भान निर्माण व्हावे, यासाठी अर्थसाक्षरता शिबिर घेण्यात आले. यात बँकेचे कामकाज, सहकार पद्धतीचे महत्त्व व पैशाचे व्यवस्थापन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



विशेष बाब म्हणजे गणेशोत्सव समितीने यावर्षी पूरपरिस्थिती लक्षात घेऊन वाद्य न लावता त्या खर्चातून व स्वतःहून दीड लक्ष रुपये जमा करून ३०० अन्नधान्य किट पूरग्रस्तांना वाटप केले. तसेच संस्थेचे कर्मचारी स्व.अविनाश पिंपरखेडे व स्व.स्वप्नील कुकडे यांचे अपघाती निधन झाल्यामुळे यांच्या कुटुंबियांना आधार म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत या समितीच्या वतीने करण्यात आली.

या उपक्रमाचे संस्थेचे संस्थापक ना.हेमंत पाटील, आमदार आनंदराव बोंढारकर यांनी कौतुक केले.,

अध्यक्ष राजश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना किल्ले स्वच्छ ठेवण्याची व जतन करण्याची शपथ दिली. व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी शिवचरित्रातून धैर्य, शिस्त व जिद्द शिकण्याची प्रेरणा घ्यावी, असे सांगून मार्गदर्शन केले.

## ईद मिलादुन्नबीनिमित्त आयोजीत रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव , दि. ८ सप्टेबर-**

अखिल विश्वाला शांततेचा मार्ग दाखविणारे शेवटचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (स ). यांच्या जयंती दिनानिमित्त मिलाद कमिटीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन आज दि.८ सप्टेंबर रोजी जुना बस स्टँड हदगाव येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते तर पोलीस उपाधीक्षक दगडू हाके, सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासह कमिटीचे पदाधिकारी, मुस्लिम बांधव यांच्या उपस्थितीत पार पडले तर उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप व लहान मुलांना जेवणाचा देखील कार्यक्रम समाजाच्या वतीने राबविण्यात आले. यावेळी ८६ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याची माहिती




आयोजकांकडून मिळाली.

हजरत मोहम्मद पैगंबर ( स). हे प्रेषित तर होतेच पण त्याबरोबर ते न्याय शासक होते, योद्धा होते, कुशल सेनापती, थोर राजनीतिज्ञ, अनाथांचे नात, कुशल व प्रभावी वक्ता, प्रमाणिक व्यापारी, गुलामांचे मुक्तिदाता, स्त्री समाजाचे उद्धारक, नि:पक्षपाती न्यायाधीश, समाज सुधारक असे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. जयंती दिनानिमित्त हदगाव शहरात शांततामय व उत्साहाच्या वातावरणात जुलूस पार पडले. यावेळी लहान मुलांचा उत्साह ओसांडून वाहत होता. ठीक - ठिकाणी त्यांच्यासाठी खाण्याची व्यवस्था होती. रक्तदान शिबिर यशस्वीते साठी कमिटीचे माजी नगरसेवक फिरोज खान पठाण, शेख बशीर, शेख खाजा ,जमीर खान पठाण, शेख जुनेद पत्रकार, बबलू पटेल, शेख सद्दाम ,शेख अझहर यांनी विशेष परिश्रम घेतले तर यावेळी शेख कलीम, अनवर खान, शेख युसुफ ,शेख रशीद, साजिद टेलर , यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्त संकलनासाठी गुरुगोविंद सिंगजी ब्लड सेंटर नांदेड यांचे सहकार्य लाभले. जुलूस शांततेत पार पडावा म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपाधीक्षक दगडू हाके हे शहरात उपस्थित होते.

## बंजारा समाजाला अनुसचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ८ सप्टेबर-**

हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील लमानी-बंजारा समाज हा अनुसूचित जमाती मध्ये असून त्याचं तत्त्वधारावर मराठवाड्यातील बंजारा, लमानी, लंबाडी हा समाज अनुसूचित जमाती या प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावा यासाठी देगलूर तालुक्यांतील सकल बंजारा समजाच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली.

हैदराबाद गॅझेटीयर अनुसार बंजारा लंबाडी समाज हा tribe (जमाती) आहे.सन १९१४ नुसार tribe (जमाती) म्हणून हैदराबाद संस्थानात बंजारा व लंबाडी सर्वात जास्त लोकसंख्या ४,०४,६१४/- एवढी नोंद आहे तर या संदर्भानुसार गोर बंजारा लमानी समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण का मिळू नये? असा ॲड. सुरेखा पवार यांनी मिडिया समोर केला. ज्या हैदराबाद गॅझेट नुसार मराठा



समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याबाबतचा शासन निर्णय जीआर काढला गेला त्याच धर्तीवर बंजारा, लमानी समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून घ्यावे अन्यथा समाजाच्या वतीने तीव्र धरणे , रस्ता रोको आदी प्रकारचे आंदोलन करण्यात इशारा विशाल पवार यांनी दिला.

जर शासनाला हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणे होत नसेल तर आम्हा सीमावृत्ती भागातील लमानी ,बंजारा समाजांना तेलंगणा राज्यात जाण्यास परवानगी द्यावी असा आग्रह शंकरराव राठोड यांनी केला. या वेळी वाडी, वस्ती, तांड्यावरील बंजारा समाजाचे शेकडो समाज बांधव उपस्थित होते.

## विद्यूत शॉक लागुन दूधगाव येथील शेतकऱ्याचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ८ सप्टेबर-**

दूधगाव (प्रधानसांगवी) येथिल गजानन पांडूरंग किरवले (वय वष ४२) या युवा शेतकऱ्याचा विद्यूपपंपात विद्यूत उतरल्यामुळे त्याचा स्पर्श होऊन जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. सदरहू घटना आज (८ सप्टेंबर) रोजी सकाळी ९ वाजताचे दरम्यान घडली. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुलं आहेत. किनवट पोलीसात मृत्यूची नोंद करुन उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात आली. सायंकाळी ४ वाजताचे आसपास त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीसांनी स्थळ पंचनामा करुन आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. तदनंतर गोकुंदा येथिल उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रीया करुन मृतदेह कुटूंबाकडे सोपवला.या दु:खद घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## ढोल-ताशांच्या व टाळ-मृदंगांच्या गजरात विघ्नहर्त्याला निरोप

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ८ सप्टेबर-**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत आपल्या सर्वांच्या लाडक्या विघ्नहर्ताला ढोल ताशाच्या व टाळ मृदंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी निरोप देण्यात आला. गणपती बाप्पा मोरया 'पुढच्या वर्षी लवकर या, गणेश भक्तांनमध्ये पहायला मिळाले.



मागील अकरा दिवसापूर्वी सर्वांच्या लाडक्या बाप्पाचे धुमधडाक्यात भक्तीमय वातावरणात मुक्रमाबाद परीसरातील प्रत्येक गावामध्ये बाप्पांची स्थापना करण्यात आली होती. या ११ दिवसांमध्ये आपण सर्वजण मनोभावाने बाप्पांची सेवा करण्यात मग्न झालो होतो. या ११ दिवसांमध्ये काही गणेश मंडळांनी विविध देखावे आयोजन केले होते. गणेश मंडळाचे समाज प्रबोधन तर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये तालुक्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घरामध्ये बाप्पांचे आगमन होऊन आपण सर्वजण बाप्पांच्या चरणी लीन झाल्यामुळे आपण भक्तीमय वातावरण झाला होता. भक्तिमय वातावरणात प्रत्येक गणेश मंडळांनी आपल्या आपल्या परीने विविध प्रकारचे चांगले देखावे सादर करून मने गणेश भक्तांना आकर्षित केले होते. अशा या भक्तिमय वातावरणात निर्माण झालेल्या बापाला निरोप देण्यासाठी दिनांक ६ सप्टेंबर रोजी ढोल ताशांच्या व टाळ मृदंगाच्या गजरात गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मुक्रमाबाद येथील शिवभक्त गणेश मंडळ भक्त गणेश मंडळ, पुरुष व महिला मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन टाळ मुद्रांच्या, फुगडी , गजर करत मिरवणुकीची शोभा वाढवली होती. तर बाल गणेश मंडळाच्या वतीने गल्ली बोळीतील हलगीच्या तालावर बाप्पांची मिरवणूक काढली होती. या हलगी पथकाने चौक येथे येताच आपल्या हलगी चे विविध प्रकारच्या सादर केलेल्या देखावा केल्यामुळे चौका, चौकात विविध प्रकारच्या तरुण गणेश भक्ताने नाचत होती.तर शंकर नगर गणेश मंडळांमध्ये महिलां सहभागी होऊन विविध धार्मिक गाणे सादर करून भक्तीमय वातावरण केले होते.

यावेळी मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण मुक्रमाबाद ग्रामपंचायत चे सरपंच प्रतिनिधी बालाजी बोधने, पोलीस पाटील व्यंकट सुवर्णकार, उपसरपंच सदाशिव बोयवार, ग्रां.प.सदस्य हेमंत खंकरे, दिनेश आवडके, ग्रा.प.सदस्य बालाजी पसरगे, पत्रकार रज्जाक कुरेशी, अशोक लोणीकर,विनोद आपटे, संजय राचलवार, यांनी अनेक गणेश भक्तावर नजर ठेवून होते. मुक्रमाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत तेरा गावात एक गाव एक गणपती स्थापना करण्यात आली होती. मुक्रमाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत १२७ गणेशचे स्थापना करण्यात आली होती. तीन टप्प्यात अंतर्गत पोलीस स्टेशन गणरायाला निरोप देण्यात आले. गावातील बाप्पांना भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आल्याची माहिती पोलीस स्टेशनच्या वतीने देण्यात आली. यावेळी मुक्रमाबाद येथील गणेश भक्तांनाच्या मिरवणुका शांततेत पार व्हाव्यात म्हणून मक्रमाबाद पोलीस स्टेशन अंतर्गत व मुखेड तहसीलदार यांच्या अंतर्गत मंडळ अधिकारी पांचाळ तलाठी केतेश्वर कोंडेवाड आदी आवर्जून उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे महादेव मंदिर परिसरात गणपती विसर्जन रस्ता खरबडू गेला होता ते ग्राम पंचायत वतीने दुरूस्त केली.मिरवणुकी वेळी मुक्रामाबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक निरिक्षक राजेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्रमाबाद बीट जमादार शिवाजी आडेकर, गोपनीय शाखेचे माधव मलगीरवार, व त्यांच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.